सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ५३ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि. १७ मार्च २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

# विदर्भातील राष्ट्रवादीचे नेते संजय खोडके यांचा महाराष्ट्र विधान परिषदेच्या निवडणुकीत नामांकन अर्ज दाखल

## अमरावती स्थित जनसंपर्क कार्यालय येथे राष्ट्रवादी काँग्रेस कार्यकर्त्यांचा जल्लोष

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७ मुंबई**

अमरावती जिल्ह्याच्या राजकारणात चाणक्य व किंग मेकर म्हणून ओळखल्या जाणारे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते संजय खोडके आता आमदार बनणार आहे. महाराष्ट्र विधानपरिषदेच्या पाच रिक्त जागांसाठी येत्या गुरुवार दिनांक २७ मार्च रोजी होणाऱ्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाच्या वतीने संजय खोडके यांना एकमताने अधिकृतरित्या उमेदवारी जाहीर करण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे यांनी याबाबत अधिकृत घोषणा केल्या नंतर आज सोमवार दिनांक १७ मार्च रोजी संजय खोडके आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार, प्रदेशाध्यक्ष खासदार-सुनील तटकरे , जेष्ठ नेते छगनराव भुजबळ, दिलीप वळसे पाटील, महायुती सरकार मधील महसूल मंत्री ना. चंद्रशेखरजी बावनकुळे , मंत्री-अनिल पाटील आदींसह विधिमंडळातील राष्ट्रवादीचे सदस्य व पदाधिकारी उपस्थित होते.



संजय खोडके हे उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांचे अत्यंत निकटवर्ती व विश्वासू म्हणून ओळखले जातात. राजकारण , समाजकारण , सहकार , प्रशासन , शिक्षण आदी क्षेत्राची उत्तम जाण असेलेले संजय खोडके हे विधिमंडळ व मंत्रालयीन कामकाजाचा प्रदीर्घ अनुभव, संघटन कौशल्य, नेतृत्व क्षमता, व्यवस्थापन, सर्व पक्षांमध्ये जनसंपर्क व समन्वय,अशा विविधांगी व्यक्तिमत्व म्हणून संजय खोडके यांची ओळख व लौकिक आहे. मागील २५ वर्षांपासून ते राजकारणात सक्रिय असून राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टीसोबत असलेली बांधिलकी व प्रदीर्घ योगदान लक्षात घेता संजय खोडके यांनी राष्ट्रवादी कडून विधान परिषदेवरील एक जागेसाठी एकमताने निवड करण्यात आली. आज संजय खोडके यांनी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी महाराष्ट्र विधानपरिषदेच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल केला असल्याने आता ते आमदार बनणार असून येत्या २७ मार्च रोजी होणाऱ्या निवडणुकीची औपचारिकता पूर्ण करून संजय खोडके आपल्या महाराष्ट्र विधानपरिषदेच्या नव्या कारकिर्दीला सुरुवात करतील. संजय खोडके आमदार बनल्याचा अमरावतीमध्ये प्रचंड उत्साह व आनंद दिसून आला. रेल्वे स्टेशन स्थित जनसंपर्क कार्यालय येथे राष्ट्रवादीच्या पदाधिकारी , कार्यकर्ते व सर्व सहकाऱ्यांनी जल्लोष करीत अभिनंदन व्यक्त केले.

## पक्षाने सर्व सामान्य कार्यकर्त्याचा सन्मान केला- संजय खोडके

महाराष्ट्र विधान परिषदेच्या निवडणुकीत नामांकन दाखल केल्या नंतर प्रतिक्रिया देतांना राष्ट्रवादी काँग्रेस चे उमेदवार संजय खोडके यांनी राष्ट्रवादी



काँग्रेस पार्टीचे मनापासून धन्यवाद ,आभार व अभिनंदन केले. राष्ट्रवादी पार्टीने नेहमीच सर्व सामान्य कार्यकर्त्यांना पक्षात काम करण्याची संधी देऊन मोठं केलं आहे. त्यांचा सन्मान केला आहे. जनतेने ना. अजितदादा पवार यांच्या नेतृत्वावर विश्वास दर्शविला असल्याने आज राज्यात राष्ट्रवादीची ताकद वाढत आहे. विदर्भातही पक्षाला चांगले यश मिळाले आहे.महायुतीकडून राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाट्याला एक जागा मिळाली असतांना पक्षाच्या वतीने सर्व संमती व एकमताने मला उमेदवारी देण्यात आल्याने सर्वांचा आभारी आहे. हा एका सर्व सामान्य कार्यकर्त्यांचा सन्मान असून आपण माननीय अजितदादांच्या नेतृत्वात जनतेच्या हित व विकासासाठी तत्परतेने काम करणार आहोत. विदर्भाच्या विकासासाठी पक्षाचे जे व्हिजन आहे. त्यासाठी व विकासासाठी आपण काम करणार असल्याची प्रतिक्रिया संजय खोडके यांनी दिली.

## दुर्दैवाने औरंगजेबाच्या कबरीला संरक्षण द्यावं लागतं, पण त्याचं महिमामंडन होणार नाही ; फडणवीसांची रोखठोक भूमिका

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७ मुंबई**

औरंगजेबाच्या कबरीवरून पुन्हा एकदा राजकीय आरोप-प्रत्यारोपांना धार आली आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची तुलना औरंगजेबाशी केल्याने भाजप आक्रमक झालेली असतानाच मविआनेही सरकारवर पलटवार करत औरंगजेबाच्या कबरीला देण्यात आलेल्या संरक्षणावर बोट ठेवलं. यावर आता मुख्यमंत्री फडणवीस यांनी भिवंडीतील एका कार्यक्रमात भाष्य करत दुर्दैवाने आपल्याला औरंगजेबाच्या कबरीला संरक्षण द्यावं लागत असलं तरी या महाराष्ट्रात त्याचं महिमामंडन होऊ देणार नाही, अशी भूमिका मांडली आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते आज भिवंडीतील मराडे पाडा येथील छत्रपती शिवाजी महाराज मंदिराचं लोकार्पण करण्यात आलं. यावेळी ते म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांनी १८ पगड जातीच्या लोकांना एकत्रित केले. शेतकरी, बलुतेदारांना एकत्र केलं. त्यांच्यात पौरुषत्व निर्माण



केले. आपल्याला देव, देश, धर्मासाठी लढायला तयार केले. हे जे बीजारोपण त्यांनी केले त्यामुळेच नंतर संभाजी महाराज राजाराम महाराज, ताराराणी यांनी स्वराज्यासाठी योगदान दिले. औरंगजेबाच्या कबरीला एएसआयने ५० वर्षापूर्वी संरक्षण दिले आहे, त्यामुळे महाराष्ट्र सरकारला देखील तिथे संरक्षण देणे क्रमप्राप्त आहे. परंतु या महाराष्ट्रात औरंगजेबाच्या कबरीचे महिमामंडन कधीच होणार नाही, असा शब्द फडणवीस यांनी यावेळी दिला.

## ब्रह्मदेव आला तरी ५ वर्षांत या सरकारला कुणी धक्का लावू शकत नाही; अजित पवारांना ठाम विश्वास

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७मुंबई**

आम्ही हा अर्थसंकल्प केवळ चालू वर्षाचा विचार करून तयार केलेला नाही. तर पुढील पाच वर्षांचा विचार करून तयार केला आहे. या ५ वर्षांत कुणी गमतीने जरी म्हटले की, अमक्या-तमक्याने मुख्यमंत्री व्हा आणि पाठिंबा देतो. तरी ते काही शक्य नाही. तुमच्याकडे आमदारच नाहीत तर तुम्ही पाठिंबा कसला देणार? १० ते २० टाळकी असताना हे आम्हाला पाठिंबा देणार का, अशा खोचक शब्दांत



राज्याचे उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत टोलेबाजी केली.

अर्थसंकल्पावरील चर्चेला अजित पवार यांनी उत्तर दिले. यावेळी अनेक मुद्द्यांवर अजित पवार यांनी विरोधकांवर पलटवार केला. चर्चेला उत्तर देताना अजित पवारांनी आमदारांना टाळकी हा शब्द वापरला. याला ठाकरे गटाचे सदस्य भास्कर जाधव यांनी आक्षेप घेत टाळकी म्हणू नका, असे म्हटले. त्यावरही अजित पवार म्हणाले की, मी आमदारांना नेहमीच सन्माननीय सदस्य म्हणत असतो. पण विरोधक ज्या पद्धतीने बोलत आहेत, त्यावर ही प्रतिक्रिया होती. पण मी एक एक सांगतो, पाच वर्षांत ब्रह्मदेव आला तरी या सरकारला कुणी धक्का लावू शकत नाही, असा ठाम विश्वास अजित पवार यांनी यावेळी व्यक्त केला.

**माझी हात जोडून विनंती आहे, असा गैरसमज पसरवू नका**

कोरोना काळात आपण काही योजना सवलती सुरू केल्या. त्या कोरोना संपल्यावर बंद कराव्या लागल्या. काही वेळा केंद्र शासनाकडून राज्याकडील योजनेप्रमाणेच लाभ देणारी नवीन योजना येते. डबल योजना नको म्हणून आणि राज्याचा खर्च वाचावा म्हणून आपली योजना आपण बंद करतो. यात काहीच चुकीचे नाही. यापूर्वीही हे अनेकदा झालेले आहे. त्यामुळे माझी हात जोडून विनंती आहे, असा गैरसमज पसरवू नका, असे अजित पवार यांनी म्हटले आहे.

## पंतप्रधानपदाच्या अकरा वर्षानंतर पहिल्यांदाच नरेंद्र मोदी संघाच्या स्मृती मंदिराला भेट देणार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७नागपूर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांचे घनिष्ठ नाते आहे. राजकीय जीवनाला सुरुवात होण्यापूर्वी पंतप्रधान मोदी यांनी पूर्णवेळ प्रचारक म्हणून अनेक वर्ष संघात काम केले आहे. परंतु, पंतप्रधान झाल्याच्या अकरा वर्षात त्यांनी अनेक कार्यक्रम नागपुरात घेतले. यापूर्वी एका कार्यक्रमाला आले असता दीक्षाभूमीही भेट दिली. परंतु राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुख्यालयात ते कधीच गेले नव्हते.

३० मार्च रोजी गुढीपाडव्याच्या दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत नागपुरात एका कार्यक्रमानिमित्त व्यासपीठावर एकत्र येणार आहेत. या कार्यक्रमापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे रेशीमबागच्या स्मृतिमंदिर येथील डॉ. हेडगेवारांच्या समाधीस्थळाचे दर्शन घेणार आहेत. स्मारक समितीच्या वतीने भैय्याजी जोशी पंतप्रधानांचे स्वागत करणार असल्याचे सांगितले जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे नागपूरच्या संघस्थानी जाणारे पहिले पंतप्रधान ठरणार आहेत. संघाचे हे शताब्दी वर्ष असल्याने मोदींची ही भेट फार महत्वाची ठरणार आहे.

रेशीमबाग येथील संघाच्या स्मृती मंदिर परिसरात संघाचे पाहिले सरसंघचालक डॉ. हेडगेवार आणि द्वितीय सरसंघचालक गोळवलकर गुरुजी यांचे समाधी स्थळ आहे. त्यामुळे हे ठिकाण संघाच्या स्वयंसेवकांसाठी श्रद्धेचे स्थान आहे.

## छत्रपती शिवाजी महाराजांचं भिवंडीत मंदिर; मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७मुंबई**

छत्रपती शिवाजी महाराज जयंतीच्या निमित्ताने भिवंडीत पहिल्या शिव मंदिराचं उद्घाटन सोमवारी पार पडलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची या सोहळ्याला प्रमुख उपस्थिती होती. छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याची गाथा या शिवमंदिराच्या माध्यमातून शिवप्रेमींना पाहायला मिळेल असं सांगितलं जात आहे. एखाद्या किल्ल्याप्रमाणेच रचना असणाऱ्या या मंदिराला शिवप्रेमींनी भेट द्यावी, असं आवाहन व्यवस्थापन समितीकडून करण्यात आलं आहे. या मंदिराला तात्काळ तीर्थस्थळाचा दर्जा दिला जाईल,




अशी घोषणा यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

या मंदिरात छत्रपती शिवाजी महाराजांची भव्य मूर्ती या मंदिरात आहे. अयोध्येतील राम मंदिरातल्या प्रभू श्रीरामांची मूर्ती घडवणारे प्रसिद्ध शिल्पकार अरुण योगीराज यांनी ही मूर्ती घडवली आहे. गडकिल्ल्यांच्या रचनेनुसारच या मंदिराची रचना असून एकूण अडीच हजार चौरस फुटांच्या परिसरात हे मंदिर उभारण्यात आलं आहे. या मंदिरासाठी एकूण तटबंदी ही पाच हजार चौरस फूट इतक्या आकाराची आहे.

मंदिराच्या उभारणीसाठी ७ ते ८ कोटी रुपये खर्च झाले असून त्यातील शिवक्रांती प्रतिष्ठान ट्रस्ट आणि काही भाग लोकवर्गणीतून उभारण्यात आला आहे. ह. भ. प. डॉ. कैलास महाराज निचिते यांच्या मार्गदर्शनाखाली वास्तुविशारद विजयकुमार पाटील यांनी मंदिराची रुपरेखा निश्चित केली आहे. मंदिराच्या भोवती तटबंदी, बुरूज आणि महाद्वार आहे. मंदिराच्या प्रवेशद्वाराची उंची ४२ फूट इतकी असून मंदिरासाठी एकूण पाच कळस आहेत.मंदिराच्या गाभाऱ्यावर ४२ फुटांचं सभामंडप, त्याभोवती गोलाकार बुरूज, टेहळणी मार्ग अशा किल्ल्याशी साधर्म साधणाऱ्या गोष्टी मंदिरात समाविष्ट करण्यात आल्या आहेत. हे सर्व बांधकाम दगडाच्या सहाय्याने करण्यात आलं आहे. मंदिराच्या तटबंदीच्या आतील भागात ३६ विभाग असून त्यातून छत्रपती शिवरायांचा इतिहास मांडणारी भव्य शिल्पे घडवण्यात आली आहेत.शिल्पकार अरुण योगीराज यांनी तब्बल साडेसहा फूट उंचीची मूर्ती या मंदिरात स्थापन करण्यात आली आहे. मंदिराच्या सर्व खांबांवर कोरीव नक्षीकाम आहे. या मंदिराला महिरपी कमान देखील आहे.छत्रपती शिवरायांसोबत महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानीही इथे आहे आणि राष्ट्रमाता राजमाता आई जिजाऊ माँसाहेबही इथे आहेत. त्यामुळे हे खऱ्या अर्थानं राष्ट्रमंदिर आहे असं म्हटलं तरी चुकीचं ठरणार नाही, अशा शब्दांत देवेंद्र फडणवीसांनी मंदिराचं वर्णन केलं.

## राज्यातील कमी पटसंख्येच्या शाळा वाचवा, शिक्षकांचे धरणे आंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७अमरावती**

राज्य सरकारने काढलेला १५ मार्चचा संच मान्यतेचा शासन निर्णय रद्द करा, शिक्षक सेवक पद रद्द करा, सर्व समित्या रद्द करून एकच शाळा व्यवस्थापन समिती ठेवा, शालेय परीक्षा एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात घ्या, इत्यादी मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्यावतीने येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सोमवारी धरणे आंदोलन करण्यात आले.

शाळेत २० किंवा २० पेक्षा कमी पटसंख्या आहे. अशा शाळेत नवीन संच मान्यतेनुसार शिक्षकाचे एकही पद मंजूर झालेले नाही. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात २५ हजारांपेक्षा अधिक प्राथमिक शिक्षक अतिरिक्त ठरत आहे. कमी पटसंख्येच्या उच्च प्राथमिक शाळातील वर्गासाठी शिक्षकाचे पदच शिल्लक न राहिल्याने त्या शाळेतील विद्यार्थ्यांना एकही शिक्षक मिळणार नाही.

शिक्षण हक्क कायदा २००९ मधील कलम १९ व २५ नुसार इयत्ता पहिली ते आठवीसाठी विद्यार्थ्यांच्या प्रमाणात शिक्षक संख्या निश्चित केली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान



आणि सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न भविष्यात निर्माण होणार आहे. अनेक विद्यार्थ्यांसह प्रामुख्याने मुलींचे शिक्षण थांबणार आहे. त्यातून गळती वाढेल आणि विद्यार्थिनी शैक्षणिक प्रवाहापासून बाहेर पडतील. ही स्थिती केवळ महाराष्ट्रातच निर्माण झालेली आहे, असे प्राथमिक शिक्षक समितीचे म्हणणे आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी ग्रामीण भागातील शैक्षणिक व्यवस्था उद्ध्वस्त करणारा १५ मार्च २०२४ चा शासन निर्णय ताबडतोब रद्द करा, अशी एकमुखी मागणी यावेळी करण्यात आली.

जिल्हा परिषद अंतर्गत विस्तार अधिकारी, केंद्र प्रमुख, उच्च श्रेणी मुख्याध्यापक, पदवीधर शिक्षक वेतन श्रेणीतील त्रुटी दूर करण्यात याव्या. संच मान्यतेचा अन्यायकारक निर्णय रद्द करावा. जिल्हास्तरावरील शिक्षकांच्या विविध समस्या निकाली काढण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदन सादर करण्यात आले.

राज्यातील शाळांमधील शिक्षक संख्येवर प्रतिकूल परिणाम करणारा व स्वतःच्या गावातील शिक्षण मिळविण्याचा हक्क डावलणारा शासन निर्णय रद्द केला पाहिजे, या प्रमुख मागणीसाठी करण्यात आलेल्या धरणे आंदोलनात शिक्षक समितीचे जिल्हा शिक्षक नेते गोकुलदास राऊत, जिल्हा सल्लागार संभाजी रेवाळे, राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर, राज्य महीला प्रतिनिधी प्रविणा कोल्हे, जिल्हाध्यक्ष अजयानंद पवार व जिल्हा सरचिटणीस शैलेन्द्र दहातोंडे, जिल्हा कार्यालयीन सचिव मनिष काळे, महिला जिल्हाध्यक्ष सरीता काठोळे व महिला सरचिटणीस विनिता घुलक्षे, यांच्यासह मोठ्या संख्येने शिक्षक सहभागी झाले होते.

## मुख्यमंत्र्यांचे विश्वासू संदीप जोशींना मिळाले संयमाचे फळ

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७नागपूर**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विश्वासू असलेले माजी महापौर संदीप जोशी यांना भाजपकडून विधानपरिषदेची उमेदवारी घोषित करण्यात आली आहे. संघ स्वयंसेवक ते महापौर अशी मजल मारणाऱ्या जोशी यांचा पश्चिम नागपूर व दक्षिण-पश्चिम नागपुरात दांडगा जनसंपर्क आहे. विधानसभा निवडणूकीत त्यांना तिकीट मिळावे यासाठी त्यांच्या समर्थकांनी जोरदार किल्ला लढविला होता. मात्र जोशी यांनी संयम बाळगत पक्षाच्या हितासाठीच काम केले. त्याचेच फळ त्यांना विधानपरिषद उमेदवारीच्या रुपात मिळाले आहे.

संघ स्वयंसेवक म्हणून सामाजिक कार्याची सुरुवात करणारे जोशी २००२ साली मनपात प्रथमच नगरसेवक म्हणून निवडून गेले. त्यानंतर जोशी यांनी कधीही मागे वळून पाहिले नाही. गणेशोत्सव, क्रीडास्पर्धा, विविध सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादी सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून त्यांनी राजकीय चौकटीबाहेर निघत स्वतःची वेगळी ओळख प्रस्थापित केली.

## संपादकीय ......

# हवामान बदलाची शेतीपुढील आव्हाने

भोंग्यांच्या आवाजावर सरकारी चाप

राज्यातील महायुती सरकारने प्रार्थनास्थळांवरील भोंग्यांबद्दल कठोर भूमिका घेतली आहे. त्याचे महाराष्ट्रातील जनतेने स्वागत करायला हवे. श्रद्धेच्या नावाखाली कर्णकर्कश आवाजाचा होणारा त्रास यापुढे थांबेल, अशा महाराष्ट्रातील जनतेच्या भावना आहेत. कायदा जुना असतो; परंतु त्याची अंमलबजावणी काटकोरपणे होत नसते, हा आजवरचा अनुभव आहे. त्यामुळे सरकारला प्रशासनाच्या माध्यमातून कारवाई करण्याचे निर्देश वारंवार द्यावे लागतात. तसे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिले आहेत.त्यानुसार आता या भोंग्यांच्या आवाजाला चाप बसणार आहे. रात्री १० ते सकाळी ६ पर्यंत भोंगे बंद असले पाहिजेत, असे मुख्यमंत्र्यांनीही स्पष्ट केले आहे. विशेष म्हणजे या कारवाईबाबतची जबाबदारी संबंधित पोलीस ठाण्यातील निरीक्षकांवर सोपविण्यात आली आहे. त्यामुळे या संदर्भात चालढकल केल्याचे निदर्शनाला आल्यास पोलीस निरीक्षकांवर कारवाईचा बडगा उगारला जाणार आहे. त्यामुळे प्रार्थनास्थळांवरील भोंग्यांसंदर्भात असलेल्या नियमांची अंमलबजावणी होईल, अशी अपेक्षा करायला हरकत नाही. त्याचे कारण पोलीस नावाची अशी एक सरकारी यंत्रणा आहे की, ज्याचा समाजातील प्रत्येक व्यक्तीशी संबंध येत असतो. शाळा-कॉलेजचा कार्यक्रम असला तरी, पोलीस ठाण्याची परवानगी घेण्यासाठी शाळा व्यवस्थापनाला पोलीस ठाण्यात जावे लागते. धार्मिक सण असो किंवा मंदिराचा जीर्णोद्धार असो. मिरवणुकीच्या परवानगीसाठी पोलीस ठाण्याची, वाहतूक पोलिसांशी परवानगी घ्यावी लागते. त्यामुळे मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रार्थनास्थळांवरील भोंग्यासंदर्भात तपासणी व कारवाईची अधिकार स्थानिक पोलीस निरीक्षकांवर दिले, ही बाब चांगली मानावी लागेल. प्रत्येक पोलीस ठाण्यात 'मिल स्पेशल' नावाने साध्या वेशात काम करणारी यंत्रणा असते. स्थानिक पोलीस ठाण्यातील हद्दीतील रेकॉर्डवरील गुंडाची माहिती पोलीस दफ्तरी नोंद असते; परंतु स्थानिक पातळीवरील राजकीय पक्षांचे नेते, कार्यकर्ते, त्यांच्या हालचालींवर ही मिल स्पेशलची टीम लक्ष ठेवून असते. एवढेच नव्हे तर आपल्या हद्दीतील शाळा, कॉलेज, उद्योगधंदे यांची बिनचूक माहिती त्यांच्याकडे असते. त्यामुळे याच पद्धतीचे काम स्थानिक पोलिसांना भोंग्यांच्या बाबतीत करावे लागणार आहे.

सकाळी ६ ते रात्री १० या वेळेत प्रार्थनास्थळांवरील भोंग्यांचा आवाज ५५ डेसिबलपेक्षा जास्त असता कामा नये, असे न्यायालयाचे निर्देश आहेत. रात्री भोंगे वापरण्यास बंदी आहे. या भोंग्यांनी दिवसा ५५ डेसिबलची मर्यादा ओलांडल्यास पोलिसांनी महाराष्ट्र प्रदूषण मंडळाला कळवून कायदेशीर कारवाई करण्याची तरतूद आहे. त्यामुळे कारवाईत दिरंगाई होत होती. या तांत्रिक कायदेशीर प्रक्रियेत भोंग्यांच्या आवाजाबाबतच्या नियमांचे पालन किंवा कारवाई होताना दिसत नव्हते. त्यामुळे यापुढे प्रार्थनास्थळांवरील भोंग्यांबाबतच्या कारवाईची जबाबदारी संबंधित पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षकांची असणार आहे. त्याचबरोबर प्रत्येक पोलीस ठाण्यात ध्वनिमापक यंत्रे उपलब्ध आहेत. प्रार्थनास्थळांवरील भोंगे आवाजाची मर्यादा ओलांडत असतील, तर परवानगी रद्द करणे, भोंगे जप्त करणे, कायदेशीर कारवाई करणे यांसारखी कारवाई पोलिसांनी करायची आहे. त्यावर सरकारचे बारीक लक्ष असेल, असे सांगून मुख्यमंत्री फडणवीस यांनी पोलिसांना मुभा दिली आहे.या संदर्भात पोलिसांनी दिलेल्या विशेष कारवाईच्या अधिकारामुळे प्रार्थनास्थळांवरील भोंग्यांवरील आवाजावर नक्कीच नियंत्रण मिळविण्यास मदत होणार आहे. त्याचबरोबर राज्यात जर कुणी ५५ डेसिबल आणि ४५ डेसिबलचे उल्लंघन करेल, त्याला पुन्हा कधीच परवानगी देऊ नका.पोलीस निरीक्षकाने प्रत्येक प्रार्थनास्थळाला भेट देऊन तपासणी करावी, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सभागृहात सांगितले आहे. प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये मीटर देण्यात आले आहे. ज्या प्रार्थनास्थळांकडून कायद्याचे उल्लंघन होणार आहे. त्याची माहिती प्रदूषण नियंत्रण बोर्डला नंतर दिली जाणार आहे. दुसऱ्या टप्प्यामध्ये अशा भोंग्यांना पुन्हा परवानगी दिली जाणार नाही, असा कडक

# वाकी रायपूर येथील सर्वज्ञ श्री. चक्रधर स्वामी पांडेश्वर देवस्थानाच्या सर्वांगीण विकासकामांचे भूमिपूजन संपन्न

## तीर्थक्षेत्र विकास निधी मधून ४.१६ कोटींचा निधी मंजूर

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.१७ वाठोडा शुक्लेश्वर**

भातकुली तालुक्यातील वाकी रायपुर येथील समस्त महानुभाव पंथीयांचे आराध्य दैवत सर्वज्ञ श्री. चक्रधर स्वामी यांचे चरणांकीत पांडेश्वर देवस्थानाच्या सर्वांगीण विकासाकरिता तिवसा विधानसभा मतदारसंघाचे आमदार श्री राजेश वानखडे यांचे प्रयत्नाने चार कोटी १६ लक्ष रुपये निधीचे विकास कामांचे भूमिपूजन मोठ्या उत्साहात पार पडले.मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल महाराष्ट्राचे मुख्यमंत्री माननीय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे आभार व्यक्त करीत मतदार संघाच्या विकास कामांकरिता सातत्याने प्रयत्नशील राहू असे उपस्थित त्यांना आश्वासित केले. शासनाच्या तीर्थक्षेत्र विकास निधी अंतर्गत भातकुली तालुक्यातील वाकी रायपूर येथील महानुभाव पंथ यांचे आराध्य दैवत असलेले श्री चक्रधर स्वामी यांचे सर्वणांकित पांडेश्वर देवस्थान असून. याचा विकासाकरिता आमदार होण्या आधीपासूनच राजेश वानखेडे सातत्याने प्रयत्नशील होते. मतप्रयासाने चार कोटी १६ लाख रुपयांचा निधी



तीर्थक्षेत्र विकास निधी अंतर्गत मंजूर करून आणल्यामुळे पांडेश्वर देवस्थानाचा यामुळे निश्चितच कायापालट होणार आहे.या निधीतून देवस्थानची संरक्षण भिंत, पूर्णा नदी पात्रातील नदिघाट, भक्त निवास, महिला पुरुषांकरिता शौचालय,त्याच प्रमाणे पोहोच रस्त्याच्या विकास कामांचा समावेश आहे.यावेळी संपूर्ण देवस्थान परिसराची पाहणी करून संबंधित कंत्राटदार व अभियंत्यांना कामाचा दर्जा उत्कृष्ट राखून गुणवत्तापूर्वक कामे करण्याची सूचना केली.वाकी रायपूर येथील लाडक्या बहिणी यांनी आमदार राजेश वानखडे यांच्यासमोर घरकुल योजना संदर्भात व्यथा मांडल्या.. आमदार राजेश वानखडे यांनी लाडका बहिणींना घरकुल योजनेचा लाभ घेणार असल्याचे आश्वासन दिले...तसेच गावातील विकास कामाबाबत गावकऱ्यांशी चर्चा करण्यात आली. यावेळी भाजपा जिल्हा सचिव अमरदीप तेलखडे, भाजपा तालुकाध्यक्ष सोपान गुडधे, अनिलभाऊ पाथरे, तालुका सरचिटणीस श्याम गवळी, अनंताभाऊ धंदर पाटील, अमोल आमझरे, नंदूभाऊ बजाज व ग्रामस्थ मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होत.

## मनपा आयुक्तांच्या हस्ते दोन सायकली प्रदान



**विदर्भ प्रजासत्ताकदि.१७अमरावती** - भारतीय अंधजन विकास व पुनर्वसन संस्थेतर्फे नुकताच राज्यस्तरीय अंधांच्या बुद्धिबळ स्पर्धांच्या आयोजन करण्यात आले होते. या आयोजनाच्या उद्घाटन प्रसंगी संस्थेतर्फे अग्रसेन भवन येथे दोन अंध कुटुंबियातील विद्यार्थ्यांना सायकली प्रदान करण्यात आल्या. दोन्ही कुटुंब अकोला येथील रहिवाशी असून आर्यन कांबळे वर्ग आठवा व दीक्षा ढोकणे ही इयत्ता दहावीची विद्यार्थिनी आहे.कार्यक्रमाचे उद्घाटक मनप आयुक्त सचिन कलंत्रे व कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय जैन संघटनेचे राष्ट्रीय विश्वस्त सुदर्शन गांग, ज्येष्ठसामाजिक कार्यकर्ते डॉ. गोविंद कासट, मुंबई येथील नॅशनल फेडरेशन ऑफ दि ब्लाइंड इंडियाचे महासचिव वसंत हेगडे, मनोहर व निर्मलाताई भूत, नवल भूत, विवेक करवा, संस्थेचे अध्यक्ष प्रा. डॉ. संजय काळे, महासचिव शाकीर नाईक इत्यादी मंडळी मंचावर हजर होते. स्वागत पर भाषण शाकीर नायक तर संचलन व आभार डॉ. संजय काळे यांनी मानले.

# उन्हाळा आलाय.. जुन्या व नव्या विहिरीचे काम करताय मग घ्या अनुदान; वाचा सविस्तर

दि.१७विदर्भ प्रजासत्ताक कृषी २

अनुसूचित जातीमधील शेतकऱ्यांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना राबविली जात असून यातून पात्र लाभार्थ्याला नवीन विहीर खोदण्यासाठी अडीच लाख रुपये अनुदान दिले जाते.




या योजनेतून प्रत्येक वर्षी विहिरी खणल्या जात आहेत. अनुसूचित जाती, नवबौद्ध शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवून त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी कृषी स्वावलंबन योजना राबवली जात आहे.

प्रत्यक्षात ही योजना जिल्हा परिषद कृषी विभागातर्फे राबवली जाते. लाभार्थीसाठी अनुदान समाज कल्याण विभागातर्फे दिले जाते. योजनेतून बऱ्याच विहिरी खोदल्या जात असल्याचे विभागाच्यावतीने सांगण्यात आले.

विहिरींची कामे उन्हाळ्यातच का करतात?

पावसामुळे चिखल आणि पाण्यामुळे विहिरीचे काम करता येत नाही. यासाठी विहिरींची कामे उन्हाळ्यातच केली जातात.

उन्हाळ्यात कमी काम

शेतकऱ्याला उन्हाळ्यात इतर शेतीची कामे कमी असतात. अन्य कामाच्या व्यापातून वेळ मिळतो.

निवड समितीत कोण?

लाभार्थी निवडीसाठीची समिती जिल्हा परिषद मुख्य

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली असते. यामध्ये सहा सदस्य कार्यरत असतात.


एका लाभार्थ्याला किती अनुदान?

योजनेतील पात्र लाभार्थ्याला नवीन विहिरीसाठी अडीच लाख, जुनी विहीर दुरुस्तीसाठी ५० हजार, इनवेल बोरिंगसाठी २० हजार रुपये, कृषिपंपासाठी २० हजार, वीज जोडणीसाठी दहा हजार रुपये, शेत तळ्याचे प्लास्टिक अस्तरीकरणासाठी एक लाख, ठिबक सिंचनासाठी ५० हजार, तुषार सिंचनासाठी २५ हजार रुपये अनुदान मिळते.

पात्रता आवश्यक आणि कागदपत्रे

शेतकरी नवबौद्ध, अनुसूचित जातीमधील असावा, सक्षम प्राधिकरणाने दिलेला जातीचा दाखला असावा, नवीन विहिरीसाठी कमीत कमी एक एकर जमीन असावी, शेतकऱ्याच्या नावे सात बारा, आठ अ असावा, विहिरीशिवाय इतर लाभ घेण्यासाठी कमीत कमी २० गुंठे जमीन असावी, लाभार्थीचे बँक पासबुक झेरॉक्स प्रत, आधार कार्ड, वार्षिक उत्पन्न दीड लाखाच्या आतील असणे गरजेचे आहे.







## जास्त चहा प्यायल्याने तुमच्या शरीरावर काय परिणाम होतो?

**दि.१७ विदर्भ प्रजासत्ताक**

चहाची तल्लफ धोकादायक ठरू शकते. भारतातील बहुतेक लोकांना सकाळी उठल्याउठल्या चहा लागतो. बरेच लोक दिवसातून १० कपपेक्षा जास्त चहा पितात. डोळे उघडल्यापासून ते झोपेपर्यंत चहा हा त्यांच्या दैनंदिन दिनचर्येचा एक भाग असतो. जर त्यांना चहा मिळाला नाही तर त्यांचा दिवस अपूर्ण वाटू शकतो. जर तुम्हीही असे करत असाल तर सावधगिरी बाळगा, कारण जास्त चहा पिल्याने तुमच्या शरीराला नुकसान होऊ शकते. चहामुळे सतर्कता आणि ऊर्जा वाढण्यास मदत होत असली तरी, त्याचे जास्त प्रमाण शरीरासाठी धोकादायक आहे. जास्त चहा पिल्याने शरीराचे काय होते ते जाणून घेऊया...



**जास्त चहा पिण्यामुळे शरीरातील समस्या**

**१. पोटाच्या समस्या वाढू शकतात**

चहामध्ये कॅफिन आणि टॅनिन आढळतात, ज्यामुळे पोटात आम्लता वाढू शकते. जास्त चहा पिल्याने ॲसिड रिफ्लक्स, गॅस आणि अपचन यासारख्या समस्या उद्भवू शकतात. विशेषतः रिकाम्या पोटी चहा पिल्याने पोटाच्या अस्तराचे नुकसान होऊ शकते. जर तुम्हाला ॲसिडिटीची समस्या असेल तर रिकाम्या पोटी चहा पिणे टाळा आणि चहामध्ये आले, वेलची किंवा तुळस घाला, त्यामुळे त्याचा परिणाम कमी होईल.

**२. झोपेवर परिणाम होऊ शकतो**

कॅफिन हे एक उत्तेजक आहे, जे मनाला जागरूक ठेवते आणि झोपेवर परिणाम करू शकते. जर तुम्ही संध्याकाळी किंवा रात्री जास्त चहा प्यायलात तर तुम्हाला अनिद्राची समस्या उद्भवू शकते. अशा परिस्थितीत, रात्री झोपण्यापूर्वी किमान ३-४ तास आधी चहा पिणे बंद करा आणि जर तुम्हाला जास्त झोपेची समस्या असेल तर तुम्ही हर्बल चहाचा पर्याय निवडू शकता.

**३. लोहाची कमतरता येऊ शकते**

जर तुम्ही जेवणानंतर लगेच चहा प्यायला तर ते शरीरात लोहाचे शोषण होण्यास अडथळा आणू शकते. ज्यांना आधीच अशक्तपणा म्हणजेच रक्ताची कमतरता आहे त्यांच्यासाठी हे विशेषतः धोकादायक आहे. अशा लोकांनी जेवणानंतर लगेच चहा पिऊ नये, तर कमीत कमी १-२ तासांचे अंतर ठेवावे.

**४. हृदय गती वाढू शकते**

जास्त चहा पिण्यामुळे कॅफिनचे प्रमाण वाढू शकते, ज्यामुळे काही लोकांना जलद हृदयाचे ठोके किंवा घबराहट जाणवू शकते. ज्यांना आधीच रक्तदाब किंवा हृदयरोग आहेत त्यांच्यासाठी हे अधिक धोकादायक ठरू शकते. चहा पिल्यानंतर जर तुम्हाला हृदयाचे ठोके वाढण्याची समस्या येत असेल तर ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घ्या आणि चहाचे प्रमाण नियंत्रित करा.

**५. हाडे कमकुवत होऊ शकतात**

जास्त चहा पिल्याने कॅल्शियमची कमतरता होऊ शकते, ज्यामुळे हाडांची ताकद कमी होते. जास्त प्रमाणात कॅफिनमुळे ऑस्टियोपोरोसिसचा धोका वाढू शकतो, जो हाडे कमकुवत करतो. म्हणून, हाडांच्या मजबूतीसाठी चहाचे सेवन मर्यादित करा आणि दूध, दही आणि हिरव्या पालेभाज्या यांसारखे कॅल्शियमयुक्त पदार्थ खा.

**६. ताण आणि चिंता वाढू शकते.**

जर कॅफिन जास्त प्रमाणात घेतले तर ते ताण आणि चिंता वाढवू शकते. जास्त चहा प्यायल्यानंतर अनेकांना चिडचिड, थकवा आणि चिंता वाटते. जर तुम्हाला चहा पिल्यानंतर चिंता वाटत असेल, तर दिवसातून २ कपपेक्षा जास्त चहा पिऊ नका आणि कॅमोमाइल किंवा ग्रीन टी सारख्या हर्बल चहांचे सेवन करा.

# भातकुली तालुक्यात अवैधरित्या वृक्षांची कत्तल, वन विभागाच्या अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७ वाठोडा शुक्लेश्वर**

भातकुली तालुक्यात दिवसाढवळ्या हिरव्या झाडांची कत्तल मोठ्या प्रमाणात चालू असल्याचे चित्र दिसून येत आहे. यामध्ये कडुनिंब, वड, पिंपळ, बाभूळ, आंबा, चिंच, आदी वृक्षाचा समावेश आहे.अशा मोठमोठ्या आणि वायू प्रदूषण रोखणाऱ्या वृक्षांची कत्तल करणारे दलाल मोठ्या प्रमाणात तालुक्यात सक्रिय झाल्याचे चित्र दिसून येत आहे.

त्यामुळे अनेक हिरव्या वृक्षांची कत्तल मोठ्या प्रमाणात वाढल्याने वन विभागाच्या अधिकाऱ्यांची या दलाला सोबत मिली भगत असल्याचे बोलल्या जात आहे.एकीकडे शासनाने झाडे लावा,झाडे जगवा हा उपक्रम मोठ्या जोमाने राबविला आहे.तर दुसरीकडे रस्त्याच्या रुंदीकरणासाठी रस्त्यालगत असणाऱ्या मोठमोठ्या वृक्षांची कत्तल केली



तर एकीकडे शेताचे धुरे पेटून आगळ्या वेगळ्या पद्धतीने वृक्षांची कत्तल सुरू आहे,

यावर वन विभागाचे दुर्लक्ष होत असल्याचे तसेच वन अधिकारी दलाला सोबत असल्याचे दिसून येत आहे.वरिष्ठ अधिकाऱ्यांनी अवैधरित्या वृक्षांच्या कत्तललीवर प्रतिबंध घालावे अशी मागणी वृक्षप्रेमी करीत आहेत.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

सोमवार दि. १७ मार्च २०२५ शहर/ग्रामिण


# एमआयडीसी येथील रामा इंडस्ट्रीजला भीषण आग

## लाखो रुपयांचे नुकसान, २५ बंबने विझविली आग

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७अमरावती** – एमआयडीसी येथील रामा इंडस्ट्रीजलारविवारी सायंकाळी ६ वाजताच्या सुमारास अचानक आग लागली. क्षणातच आगीने रौद्ररूप धारण करून पूर्ण इंडस्टीजमध्ये आग पसरली. यामध्ये लाखो रुपयांचे नुकसान झाले असून आग विझविण्याकरिता अमरावतीसह एमआयडीसी, चांदूर रेल्वे आणि तिवसा येथील अग्निशमन बोलाविण्यात आल्या. आग विझविण्याकरिता एकूण २५ बंब लागले.



हनुमान अग्रवाल यांची एमआयडीसी येथे संजय ऑईल मील आणि रामा इंडस्ट्रीज नावाने कंपनी आहे. कंपनीमध्ये ढेप, सरकी, ऑईल आणि मोठ्या प्रमाणात बारदाना आहे. रविवारी सायंकाळी कंपनी बंद असताना अचानक रामा इंडस्ट्रीजमधून धूर निघताना दिसताच कर्मचाऱ्यांनी धाव घेतली मात्र आगीचा लोंढा बाहेर आला. त्यामुळे कर्मचाऱ्यांनी तत्काळ मालकासह अग्निशमन विभागाला माहिती दिली. परंतु इंडस्ट्रीजमध्ये बारदाना, ढेप, सरकी आणि ऑईल असल्यामुळे आग क्षणातच चारही बाजूने पसरली. अग्निशमनच्या गाड्या तत्काळ घटनास्थळी पोहोचल्या मात्र आगीने तोपर्यत रौद्ररूप धारण केले होते.आग आजुबाजुच्या कंपनीपर्यंत पोहचू नये त्यामुळे अग्निशमन विभागाच्या जवानांनी चारही बाजूने पाण्याचा मारा केला. परंतु आगआटोक्यात येत नव्हती. एका पाठोपाठ २० पाण्याचे बंब घटनास्थळी पोहचले तरीसुध्दा आग पसरत होती. हे पाहताच अग्निमन विभागाने एमआयडीसी, चांदुर रेल्वे आणि तिवसा येथील बंब बोलाविले. चारही बाजूनेसतत पाण्याचा मारा असल्यामुळे रात्री ९ च्या सुमारास आग आटोक्यात आली. परंतु आगीत लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचे अग्निशमन विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.–



# बेलोरा विमानतळास डॉ. पंजाबराव देशमुख यांचे नाव द्या

## १९ मार्चला सर्वधर्मिय देणार जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

### शाहू, फुले, आंबेडकर, भाऊसाहेब देशमुख फाऊंडेशन अमरावतीचे आयोजन

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.१७अमरावती** – बेलोरा विमानतळास डॉ. पंजाबराव देशमुख यांचे नाव देण्यात यावे या मागणीसह इतर मागण्यांकरिता शाहू, फुले, आंबेडकर, भाऊसाहेब देशमुख फाऊंडेशन अमरावतीचे वतीने १९ मार्चला मोठ्याप्रमाणात सर्वधर्मिय समाजबांधवांकडून जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात येणार आहे.

बेलोरा विमानतळास डॉ. भाऊसाहेब उर्फ पंजाबराव देशमुख यांचे नाव देण्यात यावे, तसेच भाऊसाहेब देशमुख यांचा पुर्णाकृती पुतळा, बेलोरा विमानतळावर स्थापन करण्यात यावा व डॉ. भाऊसाहेब देशमुख यांना भारतरत्न देवून सन्मानित करण्यात यावे, ही मागणी विविध संस्था संघटनांकडून गेल्या ४ ते ५ वर्षांपासून करण्यात येत आहे.



१३ जुलै २०१९, रोजी बेलोरा विमानतळाच्या विस्तारीकरणाच्या प्रसंगी तात्कालीन आमदार डॉ. सुनिल देशमुख यांच्या नेतृत्वाखाली, बेलोरा विमानतळास डॉ. पंजाबराव देशमुख यांचे नाव देण्यात यावे, विमानतळाच्या दर्शनी भागात डॉ. पंजाबराव देशमुख यांचा पुर्णाकृती पुतळा व डॉ. पंजाबराव देशमुख यांना भारतरत्न पुरस्काराने गौरविण्यात यावे, या मागण्यांचे निवेदन तात्कालीन मुख्यमंत्री व विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना प्रत्यक्ष भेटून देण्यात आले होते. या मागण्यांचा, मी सकारात्मक विचार करतो, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिष्टमंडळास सांगितले होते.येणाऱ्या एप्रिल महिन्यात विमानतळ सुरू होणार असल्याचे जाहीर झाले आहे. डॉ. भाऊसाहेब देशमुख, देशाचे प्रथम कृषीमंत्री होते, त्याचबरोबर महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासोबत संविधान निर्मितीत सदस्य म्हणून त्यांनी अत्यंत मोलाची भूमिका पार पाडली आहे.भाऊसाहेबांना मानणारा वर्ग फार मोठा असून, अमरावती जिल्ह्यातच नव्हे तर संपूर्ण देशात, विदेशातसुध्दा आहे.बेलोरा विमानतळास डॉ. भाऊसाहेब देशमुख यांचे नाव देण्यासाठी अमरावती जिल्हा परीषदेने व महानगरपालिकेने सर्वानुमते ठराव पारीत केले आहेत. ही वास्तविक विचारात घेऊन बेलोरा विमानतळास डॉ. भाऊसाहेब देशमुख यांचे नाव देण्यासाठी बुधवारी १९ मार्च २०२५ रोजी सकाळी ११ वाजता सर्वधर्मिय समाजबांधवांकडून जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात येणार आहे. तेव्हा नागरिकांनी मोठ्याप्रमाणात डॉ. भाऊसाहेब देशमुखांच्या संदर्भातील मागण्या पूर्ण होण्यासाठी उपस्थित राहावे, असे आवाहन शाहू, फुले, आंबेडकर, भाऊसाहेब देशमुख फाऊंडेशन अमरावतीच्या वतीने करण्यात आले आहे.

# मेळघाटात होळीच्या पाडव्यानंतर फगव्या ची धूम



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७धारणी–**

मेळघाटातील आदिवासी बांधवांचा होळी सण हा वर्षातील सर्वात मोठा सण आहे होळी सन साजरा करण्यासाठी मागील दोन महिन्यापासूनच आदिवासी बांधव सज्ज होऊन पारिवारिक अडचणीवर मात देऊन पारिवारिक सदस्यांना नवनवीन कपडे ,घरात नवीन साहित्य ,वस्तू ,सोन्या-चांदीची, देवाण-घेवाण या सर्व बाबी होळी सणाला नित्य नियमाने विकत घेवून शुक्रवारला सर्वच आदिवासी बांधवांनी आपला होळी सण साजरा केला होळीच्या पाडव्यानंतर आपल्या जुन्या रितीरिवाजपणे प्रमाणे भगवा मागण्याची धून सर्वत्र सुरू केली आहे मेळघाटात शुक्रवारी आदिवासी पाड्यांमध्ये होळी पेटल्यानंतर आदिवासी रितीरिवाजाप्रमाणे मेळघाटातील आदिवासी बांधव गावातून जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर वाहतूक अळवून नागरिकांना नागरिकांना फगवा मागतात तो फगवा आदिवासी बांधव रंगपंचमीच्या पाच दिवसापर्यंत शहर व ग्रामीण भागातील घरोघरी दुकान शासकीय कार्यालया मध्ये जाऊन गोळा करून त्या फगव्याच्या रूपाने येणाऱ्या दान राशीमध्ये रंग पंचमीच्या दिवशी सर्व एकत्रित बसून त्या फगव्यातून मिळणाऱ्या पैशातून जेवणाची मेजवानी गुण्या गोविंदाने घेतात नागरिकांना फगवा मागताना आदिवासी बांधवांकडून कोणालाही जोर जबरदस्ती केली जात नाही स्व इच्छेने जो त्यांना फगवा देत असेल ते घेऊन घेतात परंतु आदिवासी काळापासून चालत आलेल्या जुन्या रीती रिवाजाप्रमाणे सध्याही भगव्याची धूम मेळघाटात जोरदार दिसून येत आहे.

# हॉटेल-लॉजिंग, महाविद्यालय, निवासी इमारती, चित्रपटगृहांचा फायर ऑडीटला ठेंगा


## ११५८ आस्थापनांपैकी केवळ १४७ आस्थानांकडेच एनओसी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७अमरावती**

महापालिकेच्या वतीने उन्हाळ्यापूर्वी शहरातील ११५८ आस्थापनांपैकी ६३५ आस्थापनांना नोटिस दिल्या असल्या तरी त्यापैकी फक्त १४७आस्थापनांनी नोटिसचे उत्तर देत एनओसी प्राम केल्या, उर्वरित एक हजारापेक्षा अधिक आस्थापनानी मात्र महापालिकेच्या नोटिसला ठेंगा दाखविल्याचे आकडेवारीतून स्पष्ट होते. नोटिस देण्यात आलेल्या आस्थापनांपैकी हॉटेल-लॉजिंग, महाविद्यालय, निवासी इमारती, चित्रपटगृहांनी फायर ऑडीटला नाकारल्याचेच दिसून येते.

उन्हाळा लागला की आग लागण्याच्या सर्वाधिक घटना घडतात. या घटनांना आळा घालण्यासाठी फायर सेफ्टी ऑडिट अनिवार्य असताना, शहरातील विविध शासकीय, निमशासकीय, खासगी कार्यालये, निवासी इमारती, तसेच प्रतिष्ठानांच्या फायर सेफ्टी ऑडीटकडे संबंधितांनी दुर्लक्ष केले आहे. सुरक्षा उपाययोजनांचा महापालिका क्षेत्रात बोजवाराच बाजल्याचे दिसून येत असल्याने आता महापालिका ॲक्शन मोडवर आली आहे. मनपाच्या वतीने १५ जानेवारी ते १५ मार्चपर्यंत ११५८ आस्थापनांना पैकी ६३५ आस्थापनांना नोटिस



बजावल्या आहेत. ५२३ आस्थापनांना नोटिस देण्याची प्रक्रिया सुरुच आहे. त्यापैकी केवळ १४७ आस्थापनांनी कागदपत्रांची पूर्तता करुन फायर सेफ्टी ऑडीट केले.

मात्र नोटिस देण्यात आलेल्या आस्थापनांपैकी ४८८ आस्थापनांनी या नोटिसला ठेंगा दाखविला. विशेष म्हणजे ज्या ठिकाणी गर्दी असते अशात जर आग लागली तर जिवितहानी होवू शकते अशा आस्थापनांनी सुध्दा त्याकडे पाठ फिरवली आहे.

नुकतीच चांदूर रेल्वे येथे बँकेला आग लागल्याची घटना घडली असून सुध्दा शहरातील आस्थापना मात्र फायर ऑडीट करिता गंभीर नसल्याचे दिसून येते. त्यामुळे आता महापालिका ॲक्शन मोडवर असून फायर सेफ्टी नियमांचे उल्लंघन केल्यास इमारतींचे मालक, व्यवस्थापक किंवा जबाबदार व्यक्तीवर गंभीर दंड व कायदेशीर कारवाई केल्या जाणार आहे.

### ४९ महाविद्यालय व ३२० शाळांनी फिरवली पाठ

महापालिका क्षेत्रात २३९ दवाखाने नोंदणीकृत असून त्यापैकी १५५ रुग्णालयांना नोटिस दिल्या आहेत. त्यापैकी फक्त १४० रुग्णालयांनीच एनओसी घेतली. शहरात ३९ शाळा नोंदणीकृत असून २०० शाळांना नोटिस देण्यात आल्या असून फक्त ५ शाळांमध्ये फायर ऑडीट करण्यात आले आहे. ४९ महाविद्यालय असून २० महाविद्यालयांना नोटिस देण्यात आली त्यापैकी शतप्रतिशत महाविद्यालयांनी नोटिसला ठेंगा दाखविला.

# शेतकऱ्यांची फसवणूक करणारी टोळी जेरबंद

## रिमोटच्या इलेक्ट्रीक वजनकाट्यावर मोजत होते कापूस :शिरखेड पोलिसांची धडक कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७शिरखेड–** रिमोटच्या इलेक्ट्रीक वजनकाट्यावर शेतकऱ्यांचा कापूस मोजुन लाखो रुपयांची फसवणूक करणाऱ्या टोळीला शिरखेड पोलिसांनी अटक करून गुन्हा दाखल केला. तनविर अहमद मोहम्मद जमीर, राजीक खान नुर खान (वय ४०), जाफर बेग जमीर बेग (वय ३० तिन्ही रा. नायगांव), मोहम्मद तजक्कीर मोहम्मद जमीर, मनोहर श्रीराम भवाने (वय ५६, स. बार्शी टाकळी, अकोला) आणि योगेश वाठोडकर (रा.सालोरा खुर्द, अमरावती) अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत.

शिरखेड ठाण्यांतर्गत येणाऱ्या निंभी गावातील शेतकऱ्यांचा कापुस खरेदी करण्याकरिता काही व्यापारी शनिवारी दुपारी योगेश वाठोडकरच्या मदतीने गेले होते. तेव्हा गावातील काही शेतकऱ्यांनी आपआपला कापुस विक्रीकरीता आणला होता. व्यापारी शेतकऱ्यांच्या समोरच त्यांचा कापुस इलेक्ट्रीक वजनकाट्यावर मोजून त्यांना पैसे देत होते. दरम्यान काही शेतकऱ्यांना वजनकाट्यावर संशय आल्यामुळे शुभम नंदकुमार साबळे (वय ३० रा. निंभी) याने शिरखेड पोलिसांना माहिती दिली. माहिती मिळताच ठाणेदार सचिन लुले ताफ्यासह गावात पोहचले. तेव्हा व्यापाऱ्यांच्या सोबत असलेले काही युवक तेथून पसार झाले. त्यानंतर पोलिसांनी व्यापाऱ्यासह एजंट योगेश वाठोडकरला ताब्यात घेतले. तसेच व्यापाऱ्यांनी मोजलेला कापुस व ट्रकचे वजन केल्यानंतर मोठ्या प्रमाणात तफावत दिसताच सर्वांची कसून चौकशी केली. तेव्हा इलेक्ट्रीक वजनकाट्याचे रिमोट असून वजन कमी-जास्त करता येते असे व्यापाऱ्यांनी सांगितले. तेव्हा पोलिसांनी सर्वांना अटक करुन गुन्हा दाखल केला. या कारवाईत शिरखेड ठाण्याचे ठाणेदार सचिन लुले यांच्या नेतृत्वात सपोनि, राहुल गवई, पोउपनी संजय ठाकरे, पोलीस कर्मचारी सचिन भाकरे, कळसकर, मेटकर, वैभव घोगरे, मयुर कापडे, संतोष झाडे आणि स्वप्नील डहाके यांचा समावेश होता.–

# विद्यापीठात उद्यापासून लोकनाट्य महोत्सवाची मेजवानी

## महाराष्ट्र, तेलंगणा, छत्तीसगढ़ व मध्यप्रदेशच्या लोकनाट्यांचे सादरीकरण

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.१७अमरावती :** भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाचे दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र नागपूर, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील प्रादर्शिक कला विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार, १८ ते २० मार्चदरम्यान 'लोकनाटच महोत्सव - २०२५'चे आयोजन विद्यापीठ परिसरातील विद्यार्थी विकास विभागाच्या रंगमंचावर करण्यात आले आहे.

मंगळवारी सकाळी १०.३० वाजता महोत्सवाचे उद्धाटन दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र नागपूर येथील संचालक आस्था कार्लेकर यांच्या हस्ते होणार असून अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते राहतील. उद्धाटनानंतर दुपारी १२ वाजता कोकणातील दशावतार लोकनाट्याचे सादरीकरण, प्रादर्शिक कला नृत्य व नाटय विभागाचे नेहसंमेलन, बुधवारी सकाळी ११ वाजता कथक नृत्य, 'रानभूल' एकांकिका, 'एका चोरीचे आर्थिक पृथ्थकरण' एकांकिका व दुपारी तीन वाजता तेलंगाणा राज्याचे चिंदु यक्षगान लोकनाटयाचे सादरीकरण, त्यानंतर छत्तीसगढच्या नाचा लोकनाटया चे सादरीकरण, सायंकाळी सात वाजता अभिरुची कला व क्रीडा मंदिर अमरावतीद्वारा निर्मित 'कमला' हे दोन अंकी नाटक होईल.

गुरूवारी मध्यप्रदेशचे स्वांग लोकनाटय व महाराष्ट्रातील पारंपारिक तमाशाचे सादरीकरण होईल. सायंकाळी पाच वाजता समारोपीय कार्यक्रम होईल. या महोत्सवाचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, डॉ. भोजराज चौधरी, डॉ. राहुल हळदे, डॉ. मोहन बोडे, डॉ. मनोज उज्जैनकर यांनी केले आहे.–



# अमरावती जिल्हा नूटा कार्यकारिणीची पंचवार्षिक निवडणूक अविरोध

## अमरावती जिल्हा नूटा कार्यकारिणीच्या पंचवार्षिक निवडणुकीत अविरोध निवडून आलेले सदस्य

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७अमरावती** – नागपूर विद्यापीठ टीचर असोसिएशन (नूटा) संघटनेच्या अमरावती जिल्हा कार्यकारिणीच्या पंचवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम उत्साहात आणि यशस्वीरीत्या पार पडला.या निवडणूक प्रक्रियेसाठी अमरावती जिल्हा निवडणूक अधिकारी प्राचार्य डॉ. विजयकुमार भांगडिया यांच्या अध्यक्षतेखाली सभा संपन्न झाली. तसेच डॉ. रविंद्र मुद्रे आणि डॉ. आशिष राऊत यांनी निरीक्षक म्हणून महत्वपूर्ण जबाबदारी पार पाडली.



अमरावती जिल्हा नुटा निवडणुकीत नूतन कार्यकारिणी त पुढील सदस्यांची निवड करण्यात आली.अध्यक्ष डॉ. तीर्थराज रॉय, केसरबाई महाविद्यालय अमरावती, उपाध्यक्ष डॉ. प्रवीण इंगळे, गो.सी.टोम्पे महाविद्यालय चांदूर बाजार, सचिव डॉ. सौरभघोगरे, आदर्श महाविद्याल य धामणगाव रेल्वे, सहसचिव डॉ. वैशाली देशमुख, शिवाजी सायन्स महाविद्यालय अमरावती तर सदस्य म्हणून डॉ. दिनेश पुंड, आर. आर. लाहोटी महाविद्यालय, मोर्शी, डॉ. सुनील बेलसरे, जगदंबा महाविद्यालय अचलपूर, डॉ. नितेश चोरे, विनायक सायन्स महाविद्यालय, नांदगाव खंडेश्वर यांची अविरोध निवड करण्यात आली.यावेळी डॉ. प्रवीण रघुवंशी यांनी संघटनेची भूमिका स्पष्ट करताना महाराष्ट्रातील एकसंघ आणि प्रभावी संघटना म्हणून नुटा कार्यरत असल्याचे सांगितले. निवडणूक निर्णय अधिकारी प्राचार्य डॉ. विजयकुमार भांगडिया यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, नुटा संघटनेमुळे शिक्षकांना सन्मानाचे स्थान प्राप्त झाले आहे. तसेच वेतन आणि सेवाशर्ती संबंधित अडचणी सोडवण्या साठी संघटना महत्त्व पूर्ण भूमिका बजावत आहे. कार्यक्रमास अमरावती जिल्ह्या तील १३ तालुक्यां मधील महाविद्यालया चे प्रतिनिधी आणि शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.माजी अध्यक्ष डॉ. महेंद्र मेटे आणि डॉ. तीर्थराज रॉय नवनिर्वाचित अध्यक्ष नूतन कार्यकारिणीच्या नेतृत्वाखाली उच्च शिक्षण क्षेत्रातील विविध प्रश्नांवर प्रभावी निर्णय घेतले जातील आणि शिक्षकांच्या न्याय्य हक्कांसाठी संघटना कार्यरत राहील, असा विश्वास या कार्यक्रमातून व्यक्त करण्यात आला.

# विद्यापीठाचा २५५.७२ कोटींचा अर्थसंकल्प अधिसभेत मंजूर

## ६३.३६ कोटीची तूट, कुलगुरू यांच्या अध्यक्षतेमध्ये सभा

**विदर्भ प्रजासत्ताक**



**दि.१७अमरावती** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा २०२५–२६ चा २५५.७२ कोटीचा अर्थसंकल्प अधिसभेत मंजूर करण्यात आला. व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. व्ही.एच. नागरे यांनी हा अर्थसंकल्प अधिसभेमध्ये सादर केला. अर्थसंकल्पात १९२.३६ कोटी रुपये प्राप्तीचा अंदाज व्यक्त करण्यात आला असून ६३.३६ कोटी रुपयाची तूट यामध्ये दर्शविण्यात आली आहे. कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांच्या अध्यक्षतेखाली शनिवारी अधिसभेची बैठक पार पडली. यावेळी प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे व कुलसचिव डॉ. अविनाश असनारे व सर्व अधिसभा सदस्य उपस्थित होते.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचा अर्थसंकल्प २०२५–२६ एकून तीन भागांमध्ये विभागलेला आहे. परिरक्षण, विकास आणि स्वतंत्र प्रकल्प, योजना, सहयोग कार्यक्रम अनुदान यानुसार तरतुदी करण्यात आल्या आहेत. यामध्ये परिरक्षणासाठी १८७.४० कोटी, विकासाकरिता ३६.८५ कोटी, स्वतंत्र प्रकल्प योजनांकरिता ३१.४७ कोटी रुपयाची तरतूद आहे. विद्यापीठाला केंद्रशासन, राज्य शासन, विद्यापीठ अनुदान आयोग, महाविद्यालये आणि विद्यार्थ्यांकडून अनुदान व विविध शुल्क प्राप्त होत असते.

बॉक्सअर्थसंकल्पाची वैशिष्ट्ये

विद्यापीठाच्या अर्थसंकल्पात वेतन आणि भत्त्याच्या तरतुदीत ५५ कोटी रुपयांची घट केली आहे. परीक्षा सुधारणासाठी नऊ कोटी रुपये आणि प्रशिक्षण, उद्योजकता विकास, कौशल्य विकास, संशोधन इत्यादींसाठी ८७लाख रुपयांची तरतूद केली आहे. आरोग्य केंद्रातील औषधोपचारांसाठी ७ लाख ३० हजारांची तरतूद केली आहे. विद्यापीठ स्तरावरील संशोधन निधी योजनेसाठी ५० लाख आणि आर.जी.एस.टी.सी. अंतर्गत ५० लाख रुपयांची तरतूद केली आहे. मागासवर्गीय आणि अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी नेट कोचिंग, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन आणि प्रशिक्षणासाठी प्रत्येकी दोन लाख रुपयांची तरतूद केली आहे.

# चांदूर रेल्वेत न्यायमंदिर तर धामणगावात कोल्ड स्टोरेज

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७अमरावती** चांदूररेल्वे येथे ३३ कोटींचे न्यायमंदिर ईमारत तर धामणगावात शेतकऱ्याचा ओला व सुका शेतमाल ठेवण्यासाठी कोल्ड स्टोरेज आणि महिला बचत गटाच्या रोजगाराकरिता १ कोटी १५ लक्षाचे नांदगावात बचतगट भवन, साहित्य विक्री केंद्रासाठी निधी मंजूर करून निवडणुकीदरम्यान आ. प्रताप अडसड यांनी दिलेले वचन पूर्ण केले आहे.

राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार प्रताप अडसड यांनी धामणगाव मतदारसंघाच्या सर्वांगीण विकास करण्यासाठी दमदार सुरुवात केली आहे.



अर्थसंकल्पातून चांदूरेल्वे येथे ३३ कोटी रुपयांचे न्यायमंदिर मंजूर करून घेतले. येथे प्रशस्तन्यायालयीन कक्ष, वकील कक्ष, महिला वकिलांना बसण्याची स्वतंत्र सोय, सरकारी वकिलांना कार्यालय व येणाऱ्या नागरिकांना इतर सुविधा या इमारती मुळे मिळणार आहे.

**धामणगावात भाजीपाला, शेत मालासाठी कोल्ड स्टोरेज सेंटर–** शेतकऱ्यांचा भाजीपाला नाशिवंत होऊ नये म्हणून निवडणुकीदरम्यान आ. प्रताप अडसड यांनी आप वचननाम्यात कोल्ड स्टोरेज सेंटर उभारण्याचा शब्द दिला होता. त्याप्रमाणे धामणगाव येथे हे ओत सुका भाजीपाला ठेवण्याकरिता कोल्ड स्टोरेज सेंटर जिल्हा नियोजन मधून मंजूर करून घेतले आहे. अ काळात चांदूररेल्वे, नांदगाव खंडेश्वर येथेही असे कोल्ड स्टोरेज सेंटर मंजूर करून घेण्यात येईल अस आमदार प्रताप अडसड यांनी सांगितले.

**नांदगावात महिला बचत गटांना मिळणार उद्योग** धामणगाव तालुक्यानंतर नांदगाव नांदगाव खंडेश्वर येथे १ कोटी १५ लक्ष रुपयांचे महिला बचत गट साहित्य विक्री केंद्र मंजूर करून घेतले. पिंपळगाव निपाणी, पळसमंडळ, जावरा मोळवन हा अनेक क वाहतुकीला रस्ता नव्हता. तो रस्ता ५ कोटी ६ लक्ष रुपयांचा रस्ता अर्थसंकल्पातून आ. अडसड या करून घेतला.

### नांदगावात बचतगट भवन, साहित्य विक्री केंद्र, मुख्य रस्ता मंजूर आ.प्रतापदादा अडसड यांनी वचननाम्यात दिलेले वचन पाळले

# अंजनगाव बारीत विजेच्या लंपडावाने नागरिक त्रस्त

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.१७अंजनगाव बारी** – ऐन उन्हाळ्यात विजेच्या लंपडाव्याने नागरिक त्रस्त झाले असून अंजनगाव बारी येथील कनिष्ठ अभियंत्यांचे याकडे दुर्लक्ष होत आहे. कर्मचाऱ्यांच्या बेफीकीरीमुळे नागरिकांना गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.विजेचा होणारा लंपडवा सुरूच असून सतत ये–जा करीत असल्याने याचा फटका विजेवर चालणाऱ्या उपकरणासह नागरिकांच्या व्यवसायासह होताना दिसत आहे.ग्रामीण भागातून अंजनगाव बारीला गावठाण्यातून विजेचा पुरवठा होत असून त्यावर अतिरिक्त भार आला की वीजपुरवठा बंद होतो. या मुख्य कारणासह अंजनगाव बारीला स्वतंत्र फिडरसाठी निधी आला असून त्याला वनविभागासह स्थानिक प्रशासनाकडून झालेला अडसर दूर होऊनही हे काम कधी होणार याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे. अंजनगाव बारी फिडर वेगळे केले तर अंजनगाव बारीतील विजेच्या लपंडवापासून गामस्थांना कायमची मुक्तता मिळेल आणि घरघुती विजेच्या समस्येपासून कायमची सुटका मिळेल. यासाठी लाखो रूपयाचा निधी अमरावती ग्रामीण परिमंडळात पडून आहे. हा निधी बडनेरा मेन सबस्टेशकडून हस्तांतरित करुन फिडरच्या कामाला सुरूवात करावी, अशी मागणी होत आहे.अंजनगाव बारीत मागील काही दिवसांपासून विद्युत पुरवठा खंडित होणे, विद्युत दाब अचानक कमी जास्त होणे यासारखे प्रकार नेहमीचेच झाले आहेत. अलिकडच्या काही दिवसांपासून नेहमी वीजपुरवठा खंडित असतो. चुकून एखादवेळी वीजपुरवठा सुरू झाला तर तो पुन्हा कधी खंडित होईल याचा अंदाजही नसतो. अचानक दाब अचानक कमी–जास्त



होत असल्याने विजेवर चालणाऱ्या उपकरणात बिघाड होत आहे. पुरेसा वीजपुरवठा मिळत नसल्याने पीठ गिरणी बंद राहते.त्यामुळे महिला वर्गाला कमालीचा त्रास सहन करावा लागत आहे. वेळीअवेळी वीजपुरवठा खंडित होत असल्यामुळे याचा विपरित परिणाम विजेवर चालणाऱ्या उपकरणावर होत आहे. यामुळे अनेकांच्या टीव्ही, फ्रिज, कुलर, पंखा, झेराक्स मशीन, संगणकात बिघाड येत आहे. महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.

# १८ मार्च ते २४ एप्रिल दरम्यान आयोजन

## डीसीपी, एसीपीचा पोलिस ठाण्यात जनता दरबार

### सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत राहणार हजर३० दिवसात दोनवेळा देणार व्हिजीट

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७अमरावती** शहरातील दहा पोलिस ठाण्यात तक्रार करणाऱ्या नागरिकांच्या तक्रारीचे निराकरण तात्काळ होण्यासाठी सीपी नविनचंद्र रेड्डी यांनी डीसीपी व एसीपींना पोलिस ठाण्यांना व्हिजीट देऊन जनता दरबार घेण्याच्या सुचना केल्या. त्यानुसार १८ मार्च ते २४ एप्रिल या काळयात आयुक्तालयातील डीसीपी, एसीपी आपआपल्या विभागातील पोलिस ठाण्यांना दोनवेळा भेटी देऊननागरिकांच्या तक्रारींचे निवारण करणार आहे. यासाठी नागरिकांनी आपल्या तक्रारीसह पोलिस ठाण्यात हजर रहावे, असे आवाहन शहर पोलिस दलातर्फे करण्यात आले आहे. परिमंडळ १ चे उपायुक्त सागर पाटील हे बडनेरा पोलिस ठाण्याला पहिली भेट १८ मार्च रोजी पहिली व दुसरी भेट ८ एप्रिलला देतील. त्याचप्रमाणे नांदगावपेठ पोलिस ठाणे (२० मार्च व १० एप्रिल), गाडगेनगर (२५ मार्च व १५ एप्रिल), वलगाव (२७ मार्च व १७ एप्रिल), फ्रेजरपुरा (१ एप्रिल व २२ एप्रिल), नागपुरीगेट (३ एप्रिल व २४ एप्रिल) अशा वेळा पत्रकानुसार डीसीपी सागर पाटील परिमंडळ एक मध्ये येणाऱ्या पोलिस ठाण्यांना व्हिजीट देतील. तर परिमंडळ २ चे उपायुक्त गणेश शिंदे हे राजापेठ पोलिस ठाणे (१८ मार्च व १



एप्रिल), खोलापुरीगेट (२० मार्च व ३ एप्रिल), कोतवाली (२५ मार्चव ८ एप्रिल), भताकुली (२७ मार्च व १० एप्रिल) अशा वेळा पत्रकानुसार सकाळी १० ते दुपारी २ वाजे दरम्यान पोलिस ठाण्यांना भेटी देणार आहेत. डीसीपीं प्रमाणे फ्रेजरपुराचे विभागाचे एसीपी कैलाश पुंडकर हे बडनेरा पोलिस ठाण्याला (१७ मार्चव २० मार्च), फ्रेजरपुरा पोलिस ठाण्याला (१८ व २१ मार्च), नांदगावपेठ पोलिस ठाण्याला (१९ व २४मार्च), हे गाडगेनगर पोलिस ठाण्याला (१७य२० मार्च), नागपुरीगेट (१८ व २१ मार्च), वलगाव पोलिस ठाण्याला (१९ व २४ मार्च), राजापेठ विभागाचे एसीपी जयदत्त भवंकर हे राजापेठ पोलिसठाण्याला (१७व २१ मार्च), कोतवाली (१८ व २४ मार्च), खोलापुरीगेट (१९ व २५ मार्च), भातकुली (२० व २६ मार्च) या वेळापत्रकानुसार पोलिस ठाण्यांना सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत भेट देणार आहे. एसीपी व डीसीपी पहिल्या भेटीत नागरिकांच्या तक्रारी ऐकूण त्यावर कारवाई करण्याचे अधिकार संबधीत तपास अधिकाऱ्यांना देतील आणि दुसऱ्या भेटीत तपास अधिकाऱ्यांना तक्रारींची काय पूर्तता केली, याबाबत जाब विचारणार आहे. विशेष म्हणजे सलग एक महिना पोलिस ठाण्यात तपास अधिकारी तक्रार व अर्जदारांना आमने–सामने बसवून तक्रारीचे निवारण करणार आहेत.

# डॉ. विनोद पवार जिल्हा शल्य चिकित्सक संघटनेचे अध्यक्ष

## डॉ. सुरेशकुमार ढोले उपाध्यक्ष तर डॉ. प्रिती मोरे सचिव जिल्ह्याचे सीएस डॉ. सौदळेंना सल्लागार पदाचा मान

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७अमरावती–** संपूर्ण जिल्ह्यातील खाजगी व शासकीय आरोग्य यंत्रणेचा महत्वाचा कणा असलेल्या जिल्हा शल्य कित्सक संघटनेच्या अध्यक्षपदी डफरिनचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. विनोद पवार यांनी एकमताने निवड झाली आहे. डॉ. सुरेशकुमार ढोले यांची उपाध्यक्षपदी तर डॉ. प्रिती मोरे यांची सचिवपदी निवड करण्यात आले. जिल्ह्याचे शल्यचिकित्सक डॉ. दिलीप सौदळे व डॉ. संजय पवार हे संघटनेचे सल्लागार म्हणून कामकाज पाहतील. तर डॉ. मंगेश मेंढे यांना स्टेट कॉडीनेटर पदाची जवाबदारी देण्यात आली आहे.

खाजगी असो व शासकीय डॉक्टरांना वैद्यकीय सेवा देतांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. रूग्ण एकदम ठीकझाला तर डॉक्टरांना देवाचा दर्जा देण्यात येतो. एखादा वेळेस रूग्ण दगावला तर डॉक्टरांवर हलजर्गीपणाचा ठपका ठेवत जमाव आक्रमक होतो. रूग्णालयाची तोडफोड होते तसेच कित्येकदा डॉक्टरांवर हल्ले देखील होतात. तरी देखील डॉक्टर कितीही बिकट परिस्थिती आली तरी श्रीमंत असो व गोरगरीब रूग्णांना नियमित सेवा देण्याचे काम करतात. यासह डॉक्टरांना अनेक प्रकारच्या अडचणी, समस्या असतात. त्यामुळेच डॉक्टरांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी जिल्हा शल्य चिकित्सक संघटनेची स्थापना करण्यात आली. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सौदळेयांच्या दालनात नुकत्याच झालेल्या जिल्हा शल्य चिकित्सक संघटनेच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, सदस्य पदाच्या निवडीसाठी एक महत्वपूर्ण बैठक झाली. या बैठकीमध्ये जिल्हाशल्य चिकित्सक संघटनेच्या अध्यक्षपदी डफरिनचे वैद्यकीयअधिक्षक डॉ. विनोद पवार यांनी एकमताने निवड झाली आहे. डॉ. सुरेशकुमार ढोले यांची उपाध्यक्षपदी तर डॉ. प्रिती मोरे यांची सचिवपदी निवड करण्यात आले. जिल्ह्याचे शल्यचिकित्सक डॉ. दिलीप सौदळे व डॉ. संजय पवार हे संघटनेचे सल्लागार म्हणून कामकाज पाहतील. तर डॉ. मंगेश मेंढे यांना स्टेट कॉडीनेटर म्हणून नयुक्त करण्यात आले आहे. त्याप्रमाणे संघटनेचे कार्यकारीणी सदस्यम्हणूनडॉ. संतोषराऊत, डॉ. प्रमोद नितवने, सदस्य म्हणून डॉ. दयाराम जावरकर, डॉ. रामदेव वर्मा, डॉ. नर्मता सोनवने, डॉ. काचंन पटेल, डॉ. शिवराज माने, डॉ. अजयकुमार नाथक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हा शल्य चिकित्सक संघटनेच्या सर्व पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य व सदस्यांची निवड झाल्याने राज्यातील वैद्यकीय सेवा वर्तुळातून सर्व डॉक्टरांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.–


# उष्णतेचा पारा चढला, कुलर–एसीची वाढली मागणी

### गरिबाचा मातीचा फ्रीजही महागला

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७ दर्यापूर** – यावर्षी उन्हाळा जास्त तापणार असल्याची सांगताहेत मार्च महिना लागला असून महिन्याच्या सुरुवातीलाच मोठ्याप्रमाणात पानझड सुरू झाली आहे.

यंदा काहीसा लवकरच सूर्य आग ओकू लागला आहे. गेल्या दोन–तीन दिवसांपासून नागरिकांना तसे अनुभव येत आहेत. यावर्षी तापमानात दिवसेंदिवस झपाट्याने वाढ होत असून, पारा ३६ अंश सेल्सिअसकडे वाटचाल करीत



आहे. गेल्या आठ दिवसांमध्ये पाऱ्यात तब्बल सात ते आठ अंशाने तापमानात वाढ झाली. विविध चौफुल्यावर रसवंत्या लागल्या आहेत. नागरिक उसाच्या रसाला अधिक पसंती देत आहेत.

एसी, पंखे यांचा अधिक वापर सुरू झाला आहे. दुपारनंतर ऊन तीव्र होत जाते. अचानक ऊन वाढल्याने पंख्यांनी गती घेतली. घरगुती वीज ग्राहकांना या महिन्यापासून अधिक विजेची रक्कम अदा करावी लागणार आहे. एसी, कुलर, पंखे दिवसरात्र सुरू असल्याने विजबिलातून ग्राहकांच्या खिशाला कात्री लागणार आहे. यावर्षी गरिबाचा फ्रिज म्हणजेच माठ, रांजण महागले आहेत.

# बडनेरा पोलिसांचे बेघर निराधारांसोबत धुलिवंदन

## डीजेच्या तालावर वृध्द शिरकल्याने क्षणीत आपुलकीचा आनंद

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७अमरावती** धुलिवंदनच्या दिवशी सर्वजण मदहोश होऊन धुलिवंदन साजरे करतात. परंतु, पोलिस नागरिकांच्या रंगात भंग पडू नये म्हणून दिवसभर बंदोबस्तात बिझी असतात. धुलिवंदन झाल्यानंतर पोलिस आपआपल्या परिने पोलिस ठाण्यात रंगोत्सव साजरा करतात. परंतु, यावेळी बडनेराचे ठाणेदार सुनिल चव्हाण यांनी बडनेरा येथील शासकीय निवारा केंद्रातील बेघर, निराधारांसोबत होळी साजरी करून आगळा वेगळा उपक्रम राबविला. डीजेच्या तालावर थोडा वेळ का होईना नाचल्याने महिला–पुरूष वृध्दांना काहीकाळ आपुलकीचा सहवास मिळाला. प्रत्येक ण्यातील पोलिस,

गुन्हेशाखेसह पोलिस आयुक्तालयातील सर्व संबधीत विभाग धुलिवंदन झाल्यानंतर आपआपल्या परिने आपल्या कार्यालयात धुलिवंदन साजरे करतात. परंतु, बडनेराचे ठाणेदार सुनिल चव्हाण यांनी डीसीपी सागर पाटील, फ्रेजरपुरा विभागाचे एसीपी कैलाश पुंडकर यांच्या मार्गदर्शनात यंदा धुलिवंदन बडनेरा येथील बेघरांसाठी असलेल्या शासकीय निवारा केंद्रातील निराधार महिला–पुरूषांसोबत धुलिवंदन साजरा करण्याचा निर्णय घेतला. यासाठी पोलिसांनी निवारा केंद्रात डीजे लाऊन जल्लोषात डान्स केला. तसेच निराधारांनासन्मानाने रंग लावला. काही काळ का होईना पण या वयात आणि प्रचंड टेन्शनमध्ये असलेले निराधार डीजेच्या तालावर मनसोक्त शिरकल्याने त्यांना आपलुकीचा सहभाग मिळाला. यावेळी निराधारांसाठी अल्पोहाराचा कार्यक्रम देखील आयोजित करण्यात आला होता. बडनेराचे ठाणेदार सुनिल चव्हाण यांनी बडनेरा येथील शासकीय निवारा केंद्रातील बेघर, निराधारांसोबत होळी साजरी करून आगळा–वेगळा उपक्रम राबविल्याने पोलिस वर्तुळात बडनेरा पोलिसांचे कौतुक होत आहे.

# भगवंतराव शिवाजी पाटील व बाबासाहेब सोमवंशी कनिष्ठ महाविद्यालय परतवाडा येथील वाणिज्य विभागाचा ऐतिहासिक औद्योगिक दौरा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७परतवाडा**

भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालय व बाबासाहेब सोमवंशी कनिष्ठ महाविद्यालय परतवाडा, येथे वाणिज्य विभागाच्या वतीने मंगळवार दिनांक ११ मार्च ते बुधवार दिनांक १२ मार्च २०२५ या दोन दिवसीय कालावधीत इ. ‌‌ऊे व च.ऊे च्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी संभाजीनगर येथे औद्योगिक सहलीचे आयोजन करण्यात आले होते.ही सहल बुधवार दिनांक १२ मार्च २०२५ रोजी सकाळी १०:०० वाजता वाढत्या औद्योगिकीकरणाचे महत्व लक्ष्यात घेऊन, महाराष्ट्रीतील प्रमुख १० कारखान्यांपैकी प्रसिद्ध असलेला कारखाना म्हणजे सहकार महर्षी शंकरराव कोल्हे साखर कारखाना सहजानंदनगर,पोस्ट – शिंगणापूर, तालुका – कोपरगाव,जिल्हा – अहमदनगर या कारखान्यास विद्यार्थ्यांनी भेट दिली.या कारखान्याचे संस्थापक मा.श्री.शंकरराव कोल्हे(मा.मंत्री महाराष्ट्र राज्य) हे आहे.त्यांनी सन १९६३-१९६४ मध्ये हा कारखाना सुरू केला असून याचे क्षेत्रफळ सातशे (७००)एकर आहे. या कारखान्याचे मुख्य वैशिष्ट म्हणजे हा उद्योग नफ्यासाठी नाही तर, शेतकऱ्यांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी स्थापित करण्यात आला आहे. संजीवनी संस्थेचे अध्यक्ष माजी.आ.श्री.बिपिनदादा कोल्हे हे असून,संचालक मा.श्री.विवेकभैया कोल्हे हे आहे.आणि व्यवस्थापकीय संचालक(चऊ) आ.श्री.बाजीराव जी.सुतार हे आहे.संजीवनी ग्रुपचे संस्थापक स्वर्गीय आदरणीय श्री शंकरराव कोल्हे साहेब हे असाधारण उद्योजकीय क्षमता असलेले व्यक्तिमत्व होते.समग्र विकासावर दृढ विश्वास ठेवणारे, सर्वांची समृद्धी व त्यांच्या दृढ विश्वासामुळे महाराष्ट्रातील विविध हितसंबंधांसह सर्वात यशस्वी आणि सुव्यवस्थित सहकारी साखर कारखान्यांपैकी एकाची स्थापना झाली. सुप्रसिद्ध सहकार महर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखाना लिमिटेडने, मद्य,इथेनॉल, रसायने, ऊर्जा/शक्ती, सॉल्व्हेंट्स आणि मोठ्या प्रमाणात औषधे, साखर आणि शिक्षण उद्योगात आपली उपस्थिती वाढवली असून, दिवसेंदिवस या सर्व क्षेत्रामध्ये विकास करत आहे आणि ही सर्व या संस्थेच्या उत्पादनाची मुख्य वैशिष्टे आहे. तसेच या कारखान्याला देशातील पहिले खडज नामांकन पॅरॅसिटोमॉल औषधी ओझोन निर्मिती चे प्रमाणपत्र सुद्धा भारत सरकारकडून देण्यात आले आहे. सचिव श्री.टी.आर.कानवडे यांच्या माध्यमातून या कारखान्याला भेट देण्यात आली होती.श्रीमान.चीने साहेब लेबर ऑफिसर आणि श्री.एस.बी.मोहिते यांनी विद्यार्थ्यांना अतिशय उत्तम पद्धतीने मार्गदर्शन केले असून विद्यार्थ्यांनी अगदी बारकाईने कारखान्यातील संपूर्ण गोष्टीचे संशोधनाच्या दृष्टिकोनातून ज्ञान आत्मसात केले आहे.



संपूर्ण कारखाना बघितल्यानंतर कारखान्यातील तज्ञ कर्मचारी वर्ग व विद्यार्थ्यांनी मिळून विद्यार्थ्यांचे प्रश्न आणि कर्मचाऱ्यांची उत्तरेहा छोटे खाणी कार्यक्रम कारखान्यात आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात संपूर्ण कारखान्यातील टेक्निकल क्षेत्राची माहिती श्री.एस.डी.तुवर )यांनी विद्यार्थ्यांना दिली असून विद्यार्थ्यांच्या प्रश्नाचे निरासरन केले. तसेच वाणिज्य क्षेत्राचा महत्त्वपूर्ण भाग म्हणजे लेखा व वित्त योजनाया विषयाची संपूर्ण माहिती कारखान्याचे लेखापाल श्री.आर. एन.रोकताटे यांनी विद्यार्थ्यांना दिली.

# जिल्ह्यात तुरीची चारच खरेदी केंद्र सुरू

## दरात घसरण, शेतकरी निवडत आहेत खुल्या बाजाराचा मार्ग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ अमरावती**

भारतीय राष्ट्रीय कृषी सहकारी विपणन महासंघ (नाफेड) मार्फत शासकीय केंद्रांवर तूर खरेदीचे निकष निश्चित करण्यात आले असले, तरी खरेदी केंद्रे मात्र पूर्ण क्षमतेने सुरू झालेले नाहीत. जिल्ह्यात २० खरेदी केंद्रे आहेत. मात्र, केवळ चारच केंद्रांवर खरेदी सुरू होऊ शकली. त्यामुळे शेतकऱ्यांना खुल्या बाजाराशिवाय पर्याय उरलेला नाही. आर्थिक चणचणीपायी शेतकऱ्यांनी खुल्या बाजाराचा मार्ग निवडला आहे.

बाजार समितीमधील आवक यामुळे वाढली आहे. बाजारात तुरीला सरासरी ७ हजार ५० रुपये दर प्रतिक्किंटलला मिळत आहेत. ११ मार्च रोजी अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीत तुरीला ६ हजार ८०० ते ७ हजार ३०० रुपये प्रतिकिंटल इतका दर मिळाला. तुरीची आवक ५ हजार १६६ किंटल झाली. २ मार्च रोजी तुरीला ७ हजार ५५० ते ७ हजार ७५० रुपये प्रतिकिंटल इतका दर मिळाला होता. दहा दिवसांत सरासरी पाचशे रुपयांची घसरण दिसून



आली आहे.

सरकारने हमीदराने तूर खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी उत्पादकतेच्या आधारावर खरेदीचे उद्दिष्ट निश्चित करताना मात्र हात आखडता ठेवला आहे. एकूण उत्पादनाच्या केवळ २५ टक्के तूर हमीदराने खरेदी केल्या जाणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी खासगी बाजाराचा मार्ग निवडला आहे. जिल्ह्यात यंदा १ लाख ११ हजार हेक्टर क्षेत्रात तुरीची पेरणी होती. कृषी विभागाने जिल्ह्यात यंदा १ हजार ३६० किलो प्रतिहेक्टर (५.४४ किटल प्रतिएकर) उत्पादनाची सरासरी काढली असून एकूण १ लाख ५८ हजार ६१६ टन उत्पादन होईल, असे म्हटले आहे. कृषी विभागाच्या या माहितीवर सहकार व पणन विभागाने २५ टक्के म्हणजे ३९ हजार ६५४ टन खरेदीचे उद्दिष्ट जिल्ह्यास दिले आहे.

शासकीय खरेदीसाठी नाफेडने विदर्भ मार्केटिंग व जिल्हा मार्केटिंगला अभिकर्ता म्हणून नियुक्त केले असून जिल्ह्यात २० केंद्रे प्रारंभ केली आहेत. यातील सद्यास्थितीत केवळ वरूड, चांदूर रेल्वे, दर्यापूर व तिवसा या चारच केंद्रांवर खरेदी सुरू झाली आहे. शासकीय खरेदीचा घोळ संपता संपत नसल्याने व उद्दिष्ट अतिशय कमी असल्याने शेतकऱ्यांनी खासगी बाजाराचा मार्ग स्वीकारला आहे. बाजार समितीत दररोज पाच ते सहा हजार पोत्यांची आवक होत असून सरासरी ७ हजार रुपये दर मिळत आहे. हमीदर ७ हजार ५५० रुपये असून या तुलनेत प्रतिक्किंटल ५०० रुपयांचा फटका शेतकऱ्यांना बसू लागला आहे.

# विद्यापीठाच्या योजना विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात अपयशी

## विद्यार्थी कल्याण योजनांवर मंजूर निधी खर्च करण्यात विद्यापीठ यंत्रणा अपयशी : डॉ नितीन टाले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ अमरावती**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अंतर्गत सिनेट सभागृहाच्या माध्यमातून विविध विद्यार्थी हिताच्या योजना मंजूर केला जातात. व्यवस्थापन परिषदेच्या अंतिम मान्यतेनंतर या योजनांची प्रत्यक्ष अमलबजावणी करून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी विद्यार्थी विकास विभागा कडून पार पडली जाते. परंतु या योजनांचा लाभ विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात व विद्यापीठ अर्थसंकल्पात मंजूर निधी खर्च करण्यात विद्यापीठ प्रशासन अपयशी ठरले आहे.

गरीब व गरजू विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अडचणी लक्षात घेऊन विद्यार्थी कल्याण योजनांना मंजुर केल्या जातात अशा तब्बल १२ प्रकारच्या विद्यार्थी हिताच्या योजना प्रभावीपणे गरजू विद्यार्थ्यांपर्यंत पोचविण्याकरिता प्रत्येक महाविद्यालय स्तरावर विद्यार्थी मार्गदर्शन केंद्राची निर्मिती करावी अशी मागणी सिनेट सदस्य डॉ नितीन टाले यांनी सिनेट सभेमध्ये केली.



संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या माध्यमातून विद्यार्थी हिताच्या संत गाडगेबाबा कमवा आणि शिकाय योजना, संत गाडगेबाबा विद्यार्थिनी बस पास सवलत योजना, संत गाडगेबाबा शुद्ध पेयजल योजना, संत गाडगेबाबा शिक्षण संरक्षण योजना, विद्यार्थी विकास निधी शिष्यवृत्ती योजना, विद्यार्थी सुरक्षा विमा योजना, विद्यार्थी दायित्व योजना, कौशल्य विकास योजना, स्व रामप्रकाश श्यामलाल राठी शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आलेला असून त्यावर मोठी आर्थिक तरतूद विद्यापीठ अर्थसंकल्पात केली जाते . या सर्व योजनांकरिता २०२३ – २४ मध्ये एकूण ७२२७५०० तरतूद करण्यात आलेली होती वर्ष अखेर यापैकी केवळ ४२६३०१४ रुपयांचा लाभ विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यात आला. शिल्लक तरतूद २९६४४८६ एवढी आहे. म्हणजेच विद्यार्थी हिताच्या योजनांवरील ४१ टक्के निधी विद्यार्थी विकास विभागाने खर्चच केला नाही. आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या मुलींकरिता मोफत बस पास योजना विद्यापीठाने मंजूर केली त्याकरिता ५००००० रुपयांची तरतूद करण्यात आली होती त्यापैकी केवळ ५६८६० खर्च झाले शिल्लक निधी एकूण ४४३१४० रुपये एवढी आहे. कौशल्य विकास योजने करता केलेल्या ८००००० तरतुदी पैकी केवळ १६०००० खर्च करण्यात आले.

विद्यापीठाद्वारे सर्व स्तरातील गरजू विद्यार्थ्यांकरिता विद्यार्थी कल्याणच्या विविध योजना मंजूर केलेले आहेत तसेच त्याकरिता मुबलक तरतूद सुद्धा केली जाते. परंतु विद्यापीठाच्या अकार्यक्षम प्रशासन यंत्रणेमुळे योजनांचा लाभ विद्यार्थ्यांपर्यंत पोहचू शकत नाही.

विद्यापीठाच्या या सर्व योजना तळागाळातील गरजू पोचवण्याकरिता प्रभावी कार्यक्रम आखावा तसेच महाविद्यालय स्तरावर मार्गदर्शन कक्ष व मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात यावे याकडे सिनेट सदस्य डॉ. नितीन टाले यांनी सिनेट सभेत प्रशासनाचे लक्ष वेधले.

# वकील सदस्यांना मिळालेल्या आसन व्यवस्थेचे थाटात उद्घाटन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ अमरावती**

अमरावती जिल्हा वकील संघात सन २०१९ पासुन तर सन २०२४ पर्यंत जिल्हा व सत्र न्यायालय, इमारतीमधील वकील कक्षामध्ये स्वतःच्या हक्काची आसन व्यवस्था बसण्याकरीता मिळावी या करीता विविध अर्ज अमरावती जिल्हा वकील संघाकडे आले होते. ज्यामध्ये एकुण १४० अर्ज हे सन २०१९ ते २०२४ पर्यंतच्या अमरावती जिल्हा वकील संघाच्या कार्यकारणीकडे प्राप्त झाले होते. त्याचे समाधन हे सन २०२४ च्या अमरावती जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष ॲड. विश्वास एस.



काळे, सचिव ॲड. चंद्रसेन गुळसुंदरे, उपाध्यक्ष ॲड. नितीन डी. राऊत, ग्रंथालय सचिव ॲड. मोहम्मद वसीम शेख व सर्व कार्यकारणी सदस्य यांच्या अथक प्रयत्नाने नागपुर उच्च न्यायालयामधुन सदर आसन व्यवस्थे बाबत परवानगी घेऊन ज्येष्ठ व कनिष्ठ वकील सदस्यांना दि.२१-०२-२०२५ रोजी दुपारी २ वाजता दरम्यान जिल्हा व सत्र न्यायालयाचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एस.व्ही. यार्लगड्डा व अमरावती जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष ॲड. विश्वास एस. काळे यांच्या हस्ते एकुण १४ टेबल खुर्चीसह प्रत्येकी टेबलवर ४ वकील अशी आसन व्यवस्था करून ५६ वकील सदस्य यांच्या आसन व्यवस्थेचे प्रश्न निकाली काढण्यात आला.

आसन व्यवस्थेची प्रक्रिया ही लकी ड्रा पध्दतीने करण्यात आली. तसेच उर्वरित सदस्यांना भविष्यात ज्या प्रमाणे जागा उपलब्ध होईल त्याप्रमाणे भविष्यात अमरावती जिल्हा संघ उपलब्ध करून देईल ह्याची ग्वाही दिली. सदर आसन व्यवस्थेमुळे वकील सदस्यांची आसन व्यवस्थेची सोयौं झाली असून त्यांच्या पक्षकारांनाही योग्य ठिकाणी जाऊन संबंधीत अधिवक्तांना शोधणे सोयीचे होणार आहे. सदर वकील सदस्यांना आपले दैनंदिन कामकाज करणे सोयीचे ठरणार आहे. आसन व्यवस्थेकरीता उपाध्यक्ष ॲड. एन. डी. राऊत यांनी घेतलेल्या परिश्रमाबद्दल अध्यक्षांनी त्यांचे कौतुक केले.

त्यावेळी सदर कार्यक्रमास जिल्हा व सत्र न्यायालयाचे प्रमुख न्यायाधीश सुधाकर यार्लगड्डा तसेच अमरावती जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष ॲड. विश्वास एस. काळे, सचिव ॲड. चंद्रसेन गुळसुंदरे, उपाध्यक्ष ॲड. नितीन डी. राऊत, ग्रंथालय सचिव ॲड. मोहम्मद वसीम शेख ॲड. सोनाली महात्मे, ॲड. शाहु चिखले, ॲड. सारिका भोंगाळे (ठाकरे), ॲड. विक्रम सरवटकर, ॲड. सुरज जामठे, ॲड. गजानन गायकवाड, ॲड. मांगल्य निर्मळ कार्यकारणी सदस्य व प्रसिध्दी प्रमुख ॲड. राजु म. कलाने व ॲड. गौतम पी. खोब्रागडे सदस्य अमरावती जिल्हा वकील संघ आणि मोठ्या संख्येने अमरावती जिल्हा वकील संघाचे सदस्य त्यावेळी उपस्थित होते.

# मंगरूळ दस्तगीर येथील शेतकरी सहकारी जिंनिगच्या नवीन संचालक मंडळाची निवड

## अध्यक्षपदी प्रवीण चोपडे तर उपाध्यक्षपदी भीमराव देशमुख

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७धा.रेल्वे**

तालुक्यातील मंगरूळ दस्तगीर येथील शेतकरी सहकारी जिंनिग अँड प्रेसिंगच्या अध्यक्षपदी प्रवीण चोपडे तर उपाध्यक्षपदी भीमराव देशमुख यांची बिनविरोध निवड झाली.याबद्दल त्यांचे सर्व स्तरातुन अभिनंदन होत आहे.



मंगरूळ दस्तगीर येथील शेतकरी सहकारी जिंनिग अँड प्रेसिंगच्या संचालक मंडळाची निवडणूक प्रक्रिया शांततेच्या वातावरणात पार पडली.यात अध्यक्षपदी प्रवीण चोपडे तर उपाध्यक्षपदी भीमराव देशमुख,सचिव म्हणून कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक प्रशांत सबाने यांची बिनविरोध निवड झाली.तसेच संचालक म्हणून गुणवंत देशमुख,जिल्हा परिषदेचे माजी बांधकाम व शिक्षण सभापती रामदास निस्ताने,संजय मुंधडा,नामदेव राउत,सुरेश महल्ले, प्रदीप रंगारी,ज्योती चोपडे,लक्ष्मी महल्ले यांची एकमताने निवड झाली.निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून श्री अढाऊ यांनी कर्तव्य बजावले.

शेतकऱ्यांच्या हितासाठी व कल्याणासाठी प्रामाणिक प्रयत्न करणार असून शेतकरी सहकारी जिंनिग अँड प्रेसिंगच्या प्रगती व विकासासाठी प्रयत्नशील आहे.

# जिल्ह्यामधील ५६ प्रकल्पांचा जलसाठा आला ४६ टक्क्यांवर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

गतवर्षी विभागात झालेल्या संततधार तसेच प्रकल्प क्षेत्रातील पावसामुळे १ मोठा प्रकल्प, ७ मध्यम आणि ४८ लघु अशा ५६ प्रकल्पातील जलसाठ्यात वाढ झाली. तसेच यातील बरेच प्रकल्प ओव्हरफ्लोही झाले. मात्र, आता उन्हाळ्याची तीव्रता जाणवू लागली आहे. बाष्पीभवनामुळे या ५६ प्रकल्पांचा जलसाठा कमी होत चालला आहे. या सर्व प्रकल्पांमध्ये शनिवार, (दि. १५) रोजी ४६ टक्केच जलसाठा आहे. २०२४ या सर्व प्रकल्पाचा आजच्या दिवशी ( दि १५) रोजी ५०.२० टक्के इतका जलसाठा होता. यंदा तो जवळजवळ ४ टक्क्यांनी कमी झाला आहे. त्यामुळे आगामी काळात पिण्याच्या पाण्याची टंचाईची शक्यता आहे. पिण्याच्या पाण्याची मागणी वाढत आहे. त्यामुळे पाण्याची असल्याचे कमतरता भासणार चित्र सध्याच्या आकडेवारीवरून दिसत आहे.

अमरावती जिल्ह्यात मागील वर्षी समाधानकारक पाऊस झाला. याशिवाय संततधार पावसामुळे जिल्ह्यातील प्रकल्पांच्या जलसाठ्यात वाढ झाली. त्यामुळे त्या काळात पिण्याला तसेच शेतीला पूरक पाणी मिळाले. तसेच ऑगस्ट ते सप्टेंबर या कालावधीतही पावसाने दमदार हजेरी लावली होती. सप्टेंबर अखेरपर्यंत पावसाचा जोर कायम होता. याच



काळात अवकाळी पावसाचा जोरहीपहावयास मिळाला.त्यामुळे जलपातळीत आणखी वाढ झाली. नदी, नाल्यांसह मोठे प्रकल्प आणि मध्यम प्रकल्पांच्या जल पातळीवाढली. मात्र, उन्हाळ्याच्या दिवसात पाण्याचे पाणी, सिंचन, औद्योगिक वसाहतीसाठी पाण्याची मागणी वाढते. तसेच पाण्याचे बाष्पीभवनही होते. त्यामुळे पाण्याची पातळी खाली जाते. सद्य:स्थितीत ५६ प्रकल्पात उपयुक्त जलसाठा हा ४६ टक्के आहे. जिल्ह्यातील सर्वात मोठा प्रकल्प असलेल्या अप्पर वर्धा धरणाचा पाणीसाठा हा ५३.४६ टक्के आहे. तर सात मध्यम प्रकल्पात ५२.२२ टक्के जलसाठा शिल्लक आहे. तसेच ४८ प्रकल्पात ४७.६५ टक्के जलसाठा शिल्लक राहिला आहे. यातील अनेक लघु प्रकल्प आटले असून, मध्यम प्रकल्पातील पाण्याची पातळी कमी झाल्याचे चित्र आहे.

# एमआयडीसी असोसिएशन- विद्यापीठ यांच्यात सामंजस्य करार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ अमरावती**

एमआयडीसी इंडस्ट्रियल असोसिएशन तसेच संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ रिसर्च आणि इनक्युबेशन फाउंडेशन यांच्यात उद्योग विकास, संशोधन आणि उद्योजकतेच्या वाढीसाठी नुकताच सामंजस्य करार करण्यात आला. या कराराच्या माध्यमातून उद्योग आणि शैक्षणिक संस्थांमध्ये सहकार्य वाढवणे, विद्यार्थ्यांना उद्योग व संशोधन क्षेत्रात संधी उपलब्ध करून देणे, तसेच स्टार्टअप आणि उद्योजकता, संशोधन आणि नवोपक्रमाला



चालना देणे, संयुक्त कार्यशाळा, सेमिनार आणि औद्योगिक उपक्रम आयोजित करणे, उद्योगांना नव्या तंत्रज्ञानाशी जोडणे आणि संशोधन सुविधांचा लाभ देणे, स्टार्टअप्ससाठी औद्योगिक मार्गदर्शन आणि सुविधा उपलब्ध करून देणे, हा कराराचा मुख्य उद्देश आहे. कराराप्रसंगी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. अजय लाड, एमआयडीसी असोसिएशनचे अध्यक्ष किरण पातुरकर, आशिष सावजी, रिसर्च आणि इन्क्युबेशन फाउंडेशनच्या संचालक डॉ. स्वाती शेरेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद यादव, व्यवस्थापक अमोल हिरुळकर, मोनिका उमप आदी उपस्थित होते.

# औरंगजेबाची कबर तातडीने काढा,अन्यथा बजरंग दल कारसेवा संभाजीनगरकडे कुच करेल

## चांदूर बाजार मध्ये हिंदू संघटना आक्रमक,तहसीलदारांना निवेदन





**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७चांदूर बाजार**

चांदूर बाजार तालुक्यातील हिंदू संघटना आक्रमक झाली असून आरोंगजेबाची कबर तातडीने काढावी अन्यथा बजरंग दल लखोंच्या संख्येने छत्रपती संभाजीनगरकडे कुच कुरेल असा इशारा तहसीलदार रामदास शेळके यांना निवेदन देऊन करण्यात आला मुघल शासक औरंगजेब आणि त्याच्या कबरीविषयी गेल्या काही दिवसांपासून राजकीय नेत्यांकडून वादग्रस्त वक्तव्य केली जात आहेत त्यातच आता भर पडलि आहे विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाची औरंगजेबची कबर तातडीने हटवण्याची मागणी बजरंग दलाने केली आहे यासंदर्भात संपूर्ण महाराष्ट्रात औरंग्याची कबर हटाव मोहीम हाती घेण्यात आली आहे त्या अनुषंगाने चांदूर बाजार शहरात दिनांक १७ मार्च रोजी हिंदू संघटनेच्या वतीने हजारोंच्या संख्येने मोर्चा काढत तहसीलदारांना निवेदन देण्यात आले छत्रपती संभाजी महाराज व्यायाम शाळा पासून मोर्चाची सुरवात झाली शहरातील नेताजी चौक, जयस्तंभ , किसान चौक या मार्गावरुन मोर्चा काढण्यात आला व शहरातील शिवतीर्थावरील छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन केले आणि बस एक धक्का और औरंग्याकी कबर गिरावो अशि नरेबाजी हिंदू संघटनेच्या कार्यकर्त्यांच्या वतीने करण्यात आली यासह औरंगजेबाची कबर न हटवल्यास कारसेवा करु असा इशारा बजरंग दलाकडून यावेळी देण्यात आला कायदा सुव्यवस्था लक्षात घेता चांदूर बाजार पोलिसांनी मोठा पोलीस बंदोबस्त यावेळी लावला होता यावेळी हजारोंच्या संखेने हिंदु संघटनेचे कार्यकर्ते आक्रमक झाले होते.

**औरंग्याची कबर महाराष्ट्रात असणं हे दुर्दैव आहे**

औरंग्याची कबर महाराष्ट्रात काय भारतात कुठेही नको राज्य सरकारने पुढील काळात केंद्र सरकारशी चर्चा करुन औरंगजेबाची कबर नियमानुसार काढावी नाहीतर बजरंग दल कारसेवा करुन ही कबर काढून टाकेल ज्यांनी ज्यांनी स्वत:च्या भावाला मारलं, बापाला मारलं, हजारो हिंदूंचं धर्मांतर केलं त्याची त्यामुळे राज्य सरकारने ही कबर काढून टाकावी अन्यथा बजरंग दल लाखोंच्या संख्येने छत्रपती संभाजीनगरकडे कूच करेल आम्ही राज्य सरकारला सांगून औरंगजेबाची कबर उखडून टाकू, असा इशारा गोपाल तिरमारे यांनी दिला या पार्श्वभूमीवर पोलीस आता सतर्क झाले आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालयावर आंदोलनविश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी आज अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करून छत्रपती संभाजी नगर येथील औरंगजेबाची कबर हटवण्याची मागणी केली. त्यांनी प्रशासनाला निवेदन देत ही कबर गुलामीचे प्रतीक असल्याचे नमूद केले आणि ती त्वरित नष्ट करण्याची मागणी केली. कार्यकर्त्यांनी आरोप केला की, औरंगजेबाने आपल्या काळात हिंदू धर्मीयांवर क्रूर अत्याचार केले, अनेक मंदिरे उद्ध्वस्त केली, तसेच धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज, गुरू तेगबहादूर आणि अन्य धर्मगुरूंच्या हत्या घडवून आणल्या. त्यामुळे स्वतंत्र भारतात अशा क्रूर शासकाचे कोणतेही स्मारक असू नये, असे मत आंदोलकांनी व्यक्त केले.यावेळी कार्यकर्त्यांनी प्रशासनाला इशारा दिला की, जर ही कबर लवकरात लवकर हटवली नाही, तर संपूर्ण हिंदू समाजाच्या उपस्थितीत छत्रपती संभाजी नगरकडे कारसेवा करून ती काढून टाकली जाईल. संभाव्य परिणामांसाठी प्रशासन जबाबदार राहील, असे निवेदनात नमूद करण्यात आले.

# शेतकऱ्यांच्या प्रश्नावर राज्य सरकारचे दुर्लक्ष

## महत्वाचे मुद्दे भटकवण्यासाठी औरंगजेबाचा मुद्दा उपस्थित केला जात आहे – माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांचा आरोप




**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७अमरावती**

राज्यात सध्या औरंगजेबच्या कबरी वरून वाद पेटला आहे.. याच मुद्द्यावर शरद पवार गटाचे नेते व माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी अमरावतीत पत्रकार परिषदेत भाष्य करत राज्य सरकारवर गंभीर आरोप केला, शेतकरी, शेतमजूर,महिला अत्याचारांचे या महत्त्वाच्या प्रश्नावर लोकांचे लक्ष विचलित करण्यासाठी ज्वलंत प्रश्नावर लोकांना मन भरकटवण्यासाठी अशा प्रकारचे वक्तव्य केली जात आहे अशी टीका त्यांनी केली,शासकीय कापसाचे खरेदी बंद आहे, सोयाबीन व संत्राला भाव नाही तरशेतकऱ्यांचे प्रश्न आहे त्या प्रश्नाकडे राज्य सरकारचे दुर्लक्ष आहे, औरंगजेबाची कबर उखडून फेकू हे बजरंग दलाचे वक्तव्य अतिशय दुर्दैवी आहे राज्य सरकारने दखल घ्यावी व योग्य ती कारवाई करावी कारण यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे समाजा समाजात द्वेषाची भावना निर्माण होत असंही त्यांनी म्हटलं.

# मोर्शी तालुक्यातील शेकडो सामाजिक वनीकरण मजुरांची जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७अमरावती**

मोर्शी तालुक्यातील सामाजिक वनीकरण मजुरांनी गेल्या सहा महिन्यांपासून प्रलंबित असलेल्या पगाराच्या मागणीसाठी आज अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक दिली. शेकडो मजुरांनी एकत्र येत प्रशासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी केली आणि त्वरित थकबाकी पगार मिळावा, अशी मागणी केली.

मजुरांनी सांगितले की, सहा महिन्यांपासून वेतन न मिळाल्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. अनेकांना घरातील खर्च भागवणे कठीण झाले असून, वीजबिल थकित राहिल्याने वीज वितरण कंपनीने वीज तोडण्याची नोटीस पाठवली आहे. अशा परिस्थितीत काम करूनही पगार न मिळणे अन्यायकारक असल्याचे मजुरांचे म्हणणे आहे.मजुरांनी प्रशासनाला इशारा दिला की, जर दोन दिवसांत वेतन दिले गेले नाही, तर संपूर्ण मजूर वर्ग आमरण उपोषणाला बसेल. यासंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयाकडून कोणती भूमिका घेतली जाते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# बेरदा बल्डा जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी व शिक्षकांचा अभिनव उपक्रम : गावातच मागितला शैक्षणिक फगवा



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७धारणी**

मेळघाटातील जि.प.शाळा बेरदाबल्डा केंद्र, बिजूधावडी पं स धारणी येथील आदिवासी विद्यार्थी व शिक्षकांनी होळी हा सण मेळघाटामध्ये अति उत्साहाने सर्वत्र साजरा केला जातो या सणांमध्ये सहभाग आणि सहभागी होण्यासाठी खेड्यापाड्यातील तसेच बाहेर स्थलांतरित झालेले सर्व परिवार एकत्रित येऊन होळीचा सण साजरा करतात पाच दिवस चालणाऱ्या या होळीच्या उत्साहामध्ये पहिल्या दिवशी होळीचे दहन होते. नंतर दुसऱ्या दिवशी धुलीवंदन व जुन्या रीती रिवाजाप्रमाणे मेळघाटमध्ये सर्वत्र फगवा मागितल्या जात असतो या फग वा मागणाच्या पद्धतिचे अवलोकन करून आज दिनांक शनिवारला जिल्हा परिषद उच्च प्राथमिक मराठी शाळा बेरदाबल्डा प.स धारणी येथे शैक्षणिक फगवा हा उत्सव साजरा करण्यात आला या अभिनव उपक्रमाने गावकऱ्यांचे लक्ष वेधून घेतले हा उपक्रम राबवण्याचे महत्त्वाचे कारण की मेळघाटात बरेच पालक आपल्या पाल्याला घेऊन कामात कामाला बाहेर गावी स्थलांतरित होता. विद्यार्थी स्थलांतर रोखण्यासाठी मुख्याध्यापक तसेच त्यांचे सहकारी शिक्षक यांनी शैक्षणिक फगव्याची अनोखी शकल्ल लढवली यामध्ये त्यांनी विद्यार्थी गैरहतरी ,बालविवाह रोखणे, शंभर टक्के पटनोंदणी करणे,आधार अपडेट ,केवायसी अपडेट, राशन कार्ड अपडेट करणे शाळाबाह्य विद्यार्थी रोखणे, अंधश्रद्धा निर्मुलन, शैक्षणिक गुणवत्ता वाढविणे आरोग्य योजनेची माहिती तसेच अनेक शासनाच्या योजना चा लाभ घेता येईल,तसेच ग्रामीण समस्या कशा सोडवल्या जातील याबाबत जनजागृती करून एक सामाजिक संदेश शाळेने दिला अशा या अभिनव उपक्रमा ने सर्वांचे लक्ष वेधून घेतले तसेच सर्वांनी विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती वाढविण्यासाठी व उपस्थिती वाढविण्यासाठी आश्वासन दिले फगव्या मध्ये गावातील नागरीकांनी विद्यार्थ्यांना वही पेन पेन्सील रबर चॉकलेट्स दिल्या मिळालेल्या वस्तूंचे विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आल्या तद्नंतर शिक्षक व विद्यार्थी यांनी शाळेमध्ये एकमेकांना रंग लावून होळी साजरी केली प.स . धारणी चे गटशिक्षणाधिकारी गुणवंत वरघट, विस्तार अधिकारी सुनिल खडे, केंद्र प्रमुख लक्ष्मण मुंडे यांनी या अभिनव उपक्रमाचे कौतुक केले मुख्याध्यापक श्री निलेश टोम्पे, सहकारी शिक्षक रेखाते सर, खाडे सर, दिक्षीत सर, कातखडे सर, कुहाडे मॅडम, कास्देकर सर , आरोग्य सेवीका निशा राऊत, अंगनवाडी सेविका मिनाबाई वानखडे, कलावती पटोरकर तसेच गावकरी व सर्व विद्यार्थी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# विदर्भात १९ ते २१ मार्च दरम्यान अवकाळी पावसाचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७ अमरावती.**

अमरावती शहरासह जिल्ह्यात आज ४० डिग्री तापमानाची नोंद झाली, त्यामुळे अमरावती शहरात रस्ते निर्मनुष्य झाले आहे, यावर्षी सर्वात जास्त फेब्रुवारी महिन्यापासूनच अमरावती सह विदर्भात पारा उच्चांक गाटत आहे,मात्र उद्यापासून अमरावती जिल्ह्यासह विदर्भात तापमात घट होणार आहे,विदर्भात १९ ते २१ मार्च दरम्यान अवकाळी पावसाचा इशारा हवामान खात्याच्या वतीने वर्तवण्यात आला आहे,

# तहसीलदारापेक्षा कमी दर्जाच्या अधिकाऱ्यांनी दिलेले जन्म-मृत्यू प्रमाणपत्र रद्द




**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७अकोला**

उशिराने जन्म व मृत्यू नोंदणी करून तहसीलदारांपेक्षा कमी दर्जाच्या अधिकाऱ्यांनी निर्गमित केलेले प्रमाणपत्र रद्द करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य शासनाने सोमवारी घेतला. या प्रकारे निर्गमित केलेल्या प्रमाणपत्रांची सक्षम अधिकाऱ्यांमार्फत फेरतपासणी केली जाणार आहे. उशिराने जन्म व मृत्यू नोंदणी संदर्भात राज्यात प्राप्त झालेल्या अनेक तक्रारींनंतर या प्रक्रियेला स्थगिती दिली होती. ती स्थगिती देखील रद्द करून पुन्हा ही प्रक्रिया सुरू केली जाणार आहे. या संदर्भातील आदेश महसूल विभागाचे उपसचिव महेश वरुडकर यांनी सोमवारी राज्यातील सर्व विभागीय आयुक्त व जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत.

बांगलादेशी मुस्लिमांना जन्म प्रमाणपत्र देण्याचा घोटाळा करण्यात आल्याचा गंभीर आरोप माजी खासदार किरीट सोमय्या यांनी केला. नायब तहसीलदारांना जन्म प्रमाणपत्र देण्याचे कुठलेही अधिकार नसताना गैरकायदेशीर मार्गाने त्यांनी अकोला जिल्ह्यासह राज्यात ४० हजार प्रमाणपत्र निर्गमित केल्याचे त्यांनी म्हटले आहे. दरम्यान, जन्म-मृत्यू नोंदणी कायदा १९६९ मध्ये सुधारणा करून उशिराने जन्म व मृत्यू नोंदणी संबंधिचे अधिकार हे जिल्हा दंडाधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी किंवा कार्यकारी दंडाधिकारी यांना दिले.

१२ मार्च २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार उशिराने जन्म व मृत्यू प्रकरणाची तपासणी करून प्रमाणपत्र निर्गमित करण्यात यावेत, यापूर्वी २१ फेब्रुवारी २०२५ रोजी देण्यात आलेला स्थगिती आदेश रद्द करण्यात येत असल्याचे महसूल विभागाने १७ मार्चला काढलेल्या पत्रात नमूद केले

# होळीच्या पार्श्वभूमीवर मेळघाट रंगोत्सवाचे २३ ला आयोजन

## नागरिकांनी सहभागी होण्याचे जि.प. सीईओ संजिता महापात्र यांचे आवाहन : पालकमंत्री बावनकुळे यांची राहणार विशेष उपस्थिती



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७चिखलदरा**

होळी व रंगपंचमीचे औचित्य साधून स्थानिक नागरिकांना अत्यावश्यक सेवा, सुविधा पुरविणे व सांस्कृतिक कार्यक्रमाची मेजवानी देण्यासाठी 'मेळघाट रंगोत्सव २०२५' चे आयोजन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. या रंगोत्सवामध्ये मेळघाटातील सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांनी केले आहे.

रविवार, २३ मार्च रोजी सकाळी १० वाजता या एक दिवसीय मेळघाट रंगोत्सवाचे आयोजन गिरीवन हायस्कूलसमोरील कवायत मैदानावर चिखलदरा येथे करण्यात आले आहे. या मेळघाट रंगोत्सवामध्ये स्थानिक लोकनृत्य, पारंपरिक वेशभूषा स्पर्धा आणि मेळघाटात उपलब्ध असणाऱ्या धान्य व पदार्थापासून रुचकर व पोषक पाककृती स्पर्धाचे देखील आयोजन केले आहे. तसेच या स्पर्धातील विजेत्यांसाठी आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली आहेत.याशिवाय आधार कार्ड काढणे व आधार सीडिंग करणे बँक खात्याला आधार कार्ड जोडणे, घरकुल व इतर विविध योजनांचा निधी मिळण्यात येणाऱ्या अडचणी सोडवण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. आरोग्य शिबिरही येथे आयोजित आहे.

या कार्यक्रमासाठी जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, खा. डॉ. अनिल बोंडे, खा. वळवंत वानखडे, आ. केवलराम काळे आणि विभागीय आयुक्त श्वेता सिंघल उपस्थित राहणार आहेत.

# मेळघाटात बहरलेय ग्रीष्मातील पुष्पवैभव



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७अमरावती**

पावसाळ्यात आणि हिवाळ्यात नजरेत भरणारा हिरवागार मेळघाटचा परिसर उन्हाळ्याच्या आगमनात पानगळीमुळे रुक्ष आणि उजाड वाटायला लागतो, पण निसर्गाने रखरखत्या उन्हातही लाल, जांभळ्या, पिवळ्या, गुलाबी अशा विविधरंगी फुलांचे आगळे-वेगळे सौंदर्य मेळघाटच्या ओंजळीत टाकले आहे. अनेक वृक्षांवरील ही रंगीबेरंगी फुले पर्यटकांना आनंद देत आहेत.

वसंत ऋतू हा चकचकीत, तजेलदार हिरव्यागार पालवीबरोबर अनेक वृक्षवेलींच्या फुलण्याचा, बहरण्याचा काळ असतो. जंगलात, टेकड्या-डोंगरांवर आणि नदी-नाल्यांच्या आसपास भ्रमंती करणाऱ्या निसर्गप्रेमींना आपल्या लावण्याने मोहून टाकणारे, उन्हाळ्यात फुलणारे-फळणारे असंख्य जातीचे देशी वृक्ष दिसतात.

लाल फुलांचे अशोक आणि रानपांगारा उन्हाळ्यातही फुलत राहणारे, सौंदर्याची परिसीमा गाठणारे देखणे वृक्ष आहेत. करंज, वृक्षाची चमकदार पर्णशोभा आणि गुलाबी फुलांचे तुरे मे महिन्यात पाहातच राहावेसे वाटणारे. जांभळ्या रंगाच्या फुलांनी बहरलेले गुलमोहर मेळघाटात अनेक ठिकाणी आढळते. उन्हाळ्यात सुंदर हिरवीपोपटी नाजूक पालवी नयनमोहर दिसते. लाल, किरमिजी किंवा नारिंगी रंगाच्या अतिसुंदर फुलोऱ्यांनी पानांशी साधलेली विरोधी रंगसंगती डोळयाचे पारणे फेडणारी असते. तलवारीच्या आकाराच्या काही शेंगाही झाडावर दिसतात.सुंदर पांढऱ्या रंगाची फुल असणाऱ्या साजडची पानगळ झाली असली तरी लाल, पांढऱ्या, पिवळ्या आणि गुलाबी अशा अनेक रंगाचे मिश्रण आणि त्यासोबतच सुवासिक सुगंधासह मेळघाटात कुंभीची सुंदर फुलेदेखील निसर्गप्रेमींसह पर्यटकांना मोहित करणारी आहेत. जांभळ्या रंगाची करवी, गडद लाल रंग असणारी पांगराची फुले, लाल रंगाची शाल्मली आणि पळसाची सुंदर अशी लाल फुलेदेखील डोळ्यात भरणारी आहेत.

मेळघाटच्या अंगाखांद्यांवर सर्वत्र आढळणारा बहावा सोन्याच्या दागिन्यांनी नखशिखान्त नटलेला, अंगाखांद्यावरून सोनपिवळ्या पुष्पमाला दागिन्यांसारख्या मिरवणाऱ्या बहाव्याचे पिवळीधम्मक अस्तित्व पर्यटकांना खुणावते. बहाव्याचे लाकूडही छान असते आणि शेंगा औषधी असतात.

काटेसावर हा वृक्ष देखील मेळघाटात बहरला आहे. त्याच्या फुलांकडे बुलबुल, हळदे, कोतवाल अशा विविध प्रकारचे पक्षी फुलातील मधुरस, कळ्या आणि फुले खाण्यासाठी आकर्षित होतात. वटवाघे, खार यांचे हे आवडते झाड आहे.पावसाळ्यात आणि हिवाळ्यात घनदाट असणाऱ्या हिरव्यागार जंगलात मधमाशा, फुलपाखरु आणि कीटकांसाठी मोठ्या प्रमाणात खाद्य उपलब्ध असते. मात्र उन्हाळ्यात पर्णहीन झाडांच्या जंगलात मधमाशा, फुलपाखरे आणि कीटकांना खाद्य उपलब्ध व्हावे यासाठीच निसर्गाने उन्हाळ्यातदेखील या जंगलांमध्ये विविधरंगी फुलांची व्यवस्था केली आहे, अशी माहिती निसर्ग अभ्यासक आणि लेखक प्र.सु. हिरूरकर यांनी दिली.